

# प्रबोधन गीते

## भाग-१

ज्ञान प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी रचलेली स्फूर्तिगीते

# प्रबोधन गीते

## भाग १

**(ज्ञान प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी रचलेली स्फूर्तिगीते)**

**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०

---

प्रकाशक - **कार्यवाह, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,**
**पुणे - ४११ ०३०.**
अक्षर जुळणी व मुद्रक - **छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, पुणे**
© सर्व अधिकार प्रकाशकांच्या स्वाधीन
प्रथम आवृत्ती - शके १९१३/ इ.स. १९९१
सातवी आवृत्ती - शके १९४०/ इ.स. २०१८
**मूल्य - ₹** ४०/-

## *प्रस्तावना*

ज्ञान प्रबोधिनीमध्ये गेली अनेक वर्षे विविध कार्यक्रमांच्या वेळी व नित्याच्या कामांमध्ये देशभक्तीपर व स्फूर्तिदायी गीते म्हटली जातात. सामूहिकरीत्या म्हणता येतील अशा चालीवर ती प्रबोधिनीत म्हटली जातात. या सर्व गीतांचे संकलन केल्यास अनेकांना उपयुक्त ठरेल असे वाटल्याने सुमारे २४ वर्षांपूर्वी 'प्रबोधन गीते' या पुस्तिकेची पहिली आवृत्ती प्रकाशित केली होती. त्यामध्ये ३३ गीते होती. त्यात भर पडत सातव्या आवृत्तीच्यावेळी गीतांची संख्या १०० झाली. या सातव्या आवृत्तीला प्रबोधन गीते – भाग १ म्हटले आहे. यातील सर्व पद्य-रचना प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनी केलेल्या आहेत. यात पुण्यातील कवींप्रमाणेच हराळी व साळुंब्रे येथील कवीही आहेत.

कार्यकर्त्यांच्या प्रेरणेचा एक आविष्कार त्यांच्या कामातून होतो. दुसरा त्यांच्या वर्तनातून होतो. तिसरा त्यांच्या वक्तृत्वातून होतो. चौथा गद्य लेखनातून आणि पाचवा त्यांच्या पद्य रचनेतून होतो. पहिले तीन आविष्कार त्या त्या वेळी त्यांना पाहणाऱ्या किंवा ऐकणाऱ्यांनाच प्रेरणा देणारे होऊ शकतात. गद्य-लेखन वाचणाऱ्या काही जणांना त्यातून प्रेरणा मिळू शकते. परंतु उत्तम चाली असलेल्या आणि वैयक्तिक किंवा सामूहिकरित्या गायलेल्या पद्य-रचना वर्षानुवर्षे नवीन-नवीन श्रोत्यांना व गायकांना प्रेरणा देऊ शकतात.

प्रेरणेचे स्वावलंबन म्हणून प्रबोधिनीतील कार्यकर्त्यांनीच नवीन पद्ये रचावीत असा प्रबोधिनीत आग्रह असतो. हे संकलन पाहून प्रबोधिनीच्या नवीन कवींनाही अशी प्रेरक प्रबोधन गीते लिहिण्याची स्फूर्ती व्हावी ही अपेक्षा.

प्रबोधिनीत शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी वर्षारंभ आणि वर्षाच्या शेवटी वर्षान्त समारंभ केला जातो. दरवर्षी इयत्ता आठवीतील विद्यार्थ्यांसाठी विद्याव्रतग्रहण संस्कार (रूढ भाषेत उपनयन) केला जातो. या बरोबरच श्रीगणेशाची प्रतिष्ठापना आणि बलिप्रतिपदेच्या दिवशी वहीपूजन केले जाते. या सर्व प्रसंगी सर्वजण त्या-त्या प्रसंगास उचित असा संकल्प करतात. या संकल्पाचे सामूहिक पठण होते. त्यातून चांगल्या प्रेरणा निर्माण होतात असा अनुभव आहे. ते संकल्प व प्रबोधिनीत प्रतिदिन केली जाणारी उपासना या पुस्तिकेत दुसऱ्या आवृत्तीपासून समाविष्ट केली आहे. सहाव्या आवृत्तीत मातृभूमिपूजन उपासनेची तर सातव्या आवृत्तीत विद्यारंभ उपासनेतील गद्य संकल्पाची भर घातली आहे.

**गिरीश श्री. बापट**

**सौर ज्येष्ठ, शके १९४०, जून २०१८** **संचालक, ज्ञान प्रबोधिनी**

# अंतरंग

**१. ध्येयदर्शन**

१. आव्हानांच्या गगनामध्ये ..... ५
२. एक आम्ही होऊ ! .......... ६
३. अंतरिच्या एका स्वप्नाने ..... ७
४. जीवन कणाकणाने घडे ....... ८
५. दोघेही हवे ! ................. ९
६. प्रबोधिनीत यायचे. .........१०
७. शब्द ते शक्ती .............११
८. सळसळणारे धवल तेज हे ..१२
९. सोनियाचा दिवस दारी ......१३
१०. क्षितिज नवे मज ...........१४

**२. संकल्प**

११. आम्ही जाउच जाऊ ........१५
१२. डोळे उघडून बघा गड्यांनो .१६
१३. नव्या युगाचे... .............१७
१४. पंख पसरूनी विहरे त्याला ..१८
१५. प्रबोधनाचे गीत आज हे ....१९
१६. यापुढे यशाकडे .............२०
१७. रूप देश का... (हिंदी) .....२१
१८. विज्ञाने सजवू धरणी ........२२
१९. शुभ्र सुगंधित ...............२३
२०. सुवर्णसाधना ................२४
२१. स्वप्न उद्याच्या ............२५
२२. हसरी शतवर्षे जयगान ......२६
२३. पाखरे भरारली ..............२६
२४. जे कर्तृत्वाने ................२७
२५. नव्या ताकदीने नवे .........२८

**३. आवाहन**

२६. आज प्रचीती द्या ! .........२९
२७. मनामनातून आज गर्जू दे ...३०
२८. विकसता विकसता .........३१
२९. विश्वास हा मनीचा .........३२
३०. विश्वास है हमारा (हिंदी)...३३
३१. O Lions ! ...............३४

**४. आत्मपरीक्षण**

३२. असति का ऐसे कुणी?. ....३५
३३. ततः किम्? ................३६
३४. पेटली ज्योत ...............३७
३५. वास्तुपूजन ..................३९

**५. राष्ट्रपूजन**

३६. उरात अमुच्या ..............४०
३७. मज श्रेय गवसले हो........४०
३८. ऊठ भारता! ...............४१
३९. गर्जोन उठे कथण्याते... .....४२
४०. तनूमनात... ................४३
४१. या माझ्या भारतदेशी........४४
४२. विश्वात सर्व शोभो... .......४५
४३. शतकातुनि.. ................४६
४४. हिंदु ऐक्याची ध्वजा... ......४७
४५. अजिंक्य करू या... ........४८
४६. हा उंच लहरतो... ..........४९

**६. ग्रामगीते**

४७. आज आक्रीत घडलं........५०
४८. आता नाही मी एकटी.......५१
४९. एकीचा हिसका ..............५२
५०. ऐसे माझे नमुना गाव .......५४
५१. गाणे बचतगटाचे ...........५५
५२. गाव माझा मी गावाचा .....५६
५३. गाव माझे कर्माचे मंदिर .....५७

५४. गाव सुधारलं अन् ..........५९
५५. धडधाकट घरधनी हवा! .... ६०
५६. परत फिरा रे... .............६१
५७. मी परावलंबी नाही .........६२
५८. युगांतराचे अग्रदूत व्हा रे ... ६३
५९. शिवभूमि आजला.. .........६४
६०. शीव ही ओलांडून जाणार ... ६५
६१. एक दिलानं नांदायचं हाय ... ६६
६२. संघर्ष करू, सहकार्य करू ... ६७
६३. स्वप्न पाहूया ...............६८


## ७. प्रेरणागीते


६४. आमंत्रण (हिंदी) ............६९
६५. आव्हान हे ज्योतिंना ........७०
६६. खळखळ धावत.. ...........७१
६७. आम्ही उसळत्या लाटा .....७१
६८. तेजस्वी गतिशील संघटन ...७२
६९. सपने छोडें? (हिंदी) ........७३
७०. संघटना हे सूत्र बनावे .......७४
७१. हे आनंदी गाणे .............७५
७२. हे गाणे मुक्त मनांचे ........७६
७३. नयी बहारें आई है ..........७७


## ८. आदर्शांची स्तोत्रे


७४. आज त्यामुळे कृतार्थ जीवन ७८
७५. गुरुवंदन ....................७९
७६. वरद विनायक ..............८०
७७. शतशरदांस्तव ...............८१
७८. वंदन वंदन त्रिवार वंदन .....८२
७९. उत्तिष्ठत जाग्रत ! ..........८३
८०. जाग हे शार्दूल... (हिंदी) ...८४
८१. भारतमाता एकच दैवत .....८५
८२. हाक तुझी परी मनी वसे ....८६
८३. हे वीर विवेकानंद... ........८७
८४. हे वीर विवेकानंद...(हिंदी) ..८८
८५. हे ऋषिवर श्रीअरविंद .......८९
८६. निवेदितांचे स्वप्न ...........९०
८७. हे निवेदिते माते ............९१
८८. हे कर्मयोगिन ...............९२
८९. ध्येयप्रवण साधक...........९३


## ९. विविध प्रार्थना


९०. उपासनेची जोड हवी ........९४
९१. ईश्वरचरणी समर्पित ........९५
९२. नमस्कार देवा ...............९६
९३. प्रार्थना .......................९७
९४. शुभचिंतन प्रार्थना (संस्कृत) . ९८
९५. सुदिनं सुदिनम् (संस्कृत) .... ९८
९६. हे विश्वात्मक................९९
९७. हो रही है आरती (हिंदी) . १००
९८. ध्येयाचा सुगंध ........... १००


## १०. धुनी


९९. प्रबोधिनी प्रबोधिनी ....... १०१
१००. हिंदुराष्ट्रदेवते ............ १०१


## ११. उपासना


१. दैनंदिन उपासना............. १०२
२. मातृभूमी-पूजन ............ १०५


## १२. विविध उपासनांमधील संकल्प


३. विद्यारंभ उपासना ......... ११२
४. वर्षारंभ उपासना ............ ११३
५. वर्षान्त उपासना ............ ११४
६. विद्याव्रत.................. ११६
७. गणेश प्रतिष्ठापना .......... ११८
८. बलिप्रतिपदा ................ ११९

## १. आव्हानांच्या गगनामध्ये

आव्हानांच्या गगनामध्ये
मुक्त आम्ही फिरणार
कर्तृत्वाचे पंख आमुचे
कधीच ना थकणार ।। ध्रु. ।।

अभ्यासाशी दोस्ती करूनी
हिरव्या डोंगरवाटा फिरूनी
चुस्त तनाने मस्त मनाने
गीत नवे रचणार ।। १ ।।

प्रतिभाशाली प्रज्ञा अमुची
ज्योत अंतरी विश्वासाची
शास्त्र कलांची करून साधना
वीरव्रती बनणार ।। २ ।।

असोत रस्ते बिकट, वाकडे
परंपरांची अंध झापडे
जन्मजात भेदांच्या सीमा
उल्लंघून जाणार ।। ३ ।।

एकाकी ही वाट नसावी
सन्मित्रांची साथ असावी
स्वप्न उद्याचे सत्य बनविण्या
शर्थ आम्ही करणार ।। ४ ।।

## २. एक आम्ही होऊ...

अभिमानाने, अनासक्तीने, विश्वासाने, विनयवृत्तीने
एक विचारे, एक मताने, एक आम्ही होऊ ।।ध्रु. ।।

वारस आम्ही मैत्रेयीच्या, सरस्वती विदुषी गार्गींच्या
कणाकणाने ज्ञान वेचुनि आत्मोन्नति घडवू ।।१ ।।

शिवसंकल्पे प्रसन्न तन-मन, सजगतेत हो गुणसंवर्धन
उत्कट अस्फुट मन:शक्तीचा शोध नित्य घेऊ ।।२ ।।

लक्ष्मी अहिल्या स्फूर्तिदायिनी, आत्मबलाने बनु तेजस्विनी
पराक्रमाच्या कृति घडविण्या जिद्द मनी जागवू ।।३ ।।

उंबरठ्याचे बंधन त्यजुनि, स्त्रीसमाज हा जागृत करुनि
किरणशलाका होऊन जगती, ज्ञानदीप चेतवू ।।४ ।।

स्त्री शक्ति हे शस्त्र बनू दे, अनीतीचा भ्रष्टाचार वधु दे
बुद्धि, शक्ति अन् सामर्थ्याने जगन्मान्य होऊ ।।५ ।।

## ३. अंतरिच्या एका स्वप्नाने.....

अंतरिच्या एका स्वप्नाने मूर्तरूप घेतले
कलश-विराजित या वास्तूने यशोनील देखिले ।। ध्रु. ।।

रचिले पायी संकल्पांचे अभंग उत्कट चिरे
सहज मागुती उभी राहिली सिद्धीची गोपुरे
प्राकारांची किमया येथे प्रतिभेलागी स्फुरे
श्रमयज्ञातुनि साफल्याचे पायस हे लाभले ।। १ ।।

रसरसणाऱ्या चैतन्याचे झरे इथे खेळती
आकांक्षी श्वासांच्या वेली गगनाला भिडती
समर्पणाच्या भगव्या ज्वाला होमातून उठती
चित्‌शक्तीच्या अवतरणास्तव पुण्यतीर्थ निर्मिले ।। २ ।।

मातृभूमि हे दैवत येथे स्थापियले-पूजिले
त्याग, पराक्रम, सेवा यांचे त्रिदल पदी वाहिले
कर्मसुमातुन ज्ञान-भक्तिचे परिमळ दरवळले
चहू दिशांनी आज विकसती या कमलाची दले ।। ३ ।।

पूर्तीला जातील येथुनी जनमनिची ईप्सिते
घडतिल येथे द्रष्टे, चिंतक, नवयुगनिर्माते
प्रखर तयांची प्रज्ञा वेधिल विश्वरहस्याते
देवत्वाप्रत खचित पोचतिल पथिकसंघ येथले ।। ४ ।।

# ४. जीवन कणाकणाने घडे

विद्यालय हे सगळे त्रिभुवन विद्यार्थीपण हे आजीवन
त्यास न पुस्तक शिक्षक पदवी स्वयंश्रमाने सारे शिक्षण
ग्रंथान्तरिचे ज्ञानामृत जर जगण्या अपुरे पडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे
जीवन कणाकणाने घडे।।ध्रु.।।

निश्चित समयी घडेल निश्चित, नियत ठिकाणी वस्तु सापडत
स्थलकालाचा असा भरवसा ज्याच्यायोगे होई अवगत
वळण असे जो देइल मजला तो सद्गुरु सापडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे।।१।।

परपस्परांशी घेइल जमवुन मना गवसणी मृदमधु बोलुन
उदंड वाचन मार्मिक लेखन जना जोडण्या करि आवाहन
कौशल्यांची अशा शिकवणी अवचित पदरी पडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे।।२।।

मनीं कणव अन् शरीर सक्षम, सेवाभावी तसा युद्धरत
प्रतिभेचा जणु निर्झर वाहत, निर्धारि व्रत करी अखंडित
निर्भय हसरा लोकजयिष्णू संकटास जो भिडे
भवतालीच्या जीवनकलहामधुनि घेऊ या धडे।।३।।

## ५. दोघेही हवे !

राष्ट्ररथाला विजयी व्हाया समबल चक्रे दोन हवी
वज्रासम दृढनिश्चय आणिक बिजली सम समशेर हवी
समाजपक्ष्या, नभ जिंकाया पंखहि तुजला दोन हवे
गती हवी तुज, दिशा हवी अन् अमोघ ऐसे धैर्य हवे
जीवन-अंकुर रुजुनी येण्या, सूर्यकरांची ऊब हवी
आणि त्याच्या भरण पोषणा माय मातिची प्रीत हवी
वादळवाऱ्यापासून जपण्या, कणखर, वत्सल हात हवे
दीपज्योतिला सुतेज करण्या अमृत हृदयातील हवे
रणभेरींचा घोष हवा अन् मुरलीचा स्वरस्पर्श हवा
दुष्टविनाशी शौर्यालागी ममतेचा आशीष हवा
शंकर करितो तांडव आणिक नृत्य देविचे लास्य असे
जगताच्या या मायपित्यांचे अपूर्व ऐसे ऐक्य असे
कोण श्रेष्ठ हा वाद कशाला? जग तर दोघांचे घडले
शिवशक्तीची गुंफण होऊन विश्वरूप दिसते सजले !

## ६. प्रबोधिनीत यायचे...

प्रबोधिनीत यायचे समर्थ व्हावया
समर्थ मायभूमीला जगी करावया ।। ध्रु. ।।

खेळ खूप खेळुनी सतेज व्हायचे
रोज नवे ज्ञानदिवे चेतवायचे
सुरेख लेखना, उदंड वाचना
स्फूर्ती घेऊ या, या यशाकडेच जाऊ या ।। १ ।।

फूल फूल गुंफुनीच माळ होतसे
थेंब थेंब झेलुनी झरा वहातसे
मोकळ्या मनी, प्रेम फुलवुनी
माळा गुंफू या, या साखळी जोडुया ।। २ ।।

हातचे न हात हे कधी सुटायचे
बिकट वाट ही तरी पुढेच जायचे
ना रुसायचे, सदा हसायचे
गीता गाऊ या, या प्रेरणा घेउया ।। ३ ।।

मान मायभूमिची जगात उंचवू
जेथ जाऊ तेथ तेथ विजय मेळवू
जिद्द जागवू, मशाल पेटवू
ही हाक ऐकून या, या ज्योत घेऊन या ।। ४ ।।

## ७. शब्द ते शक्ती

जगणे म्हणजे केवळ संगर, लढणे आपुल्या हाती
शब्दांपासून हो प्रारंभा, अंतिम आतील शक्ती ।। ध्रु. ।।

समाज भवती परजून आहे, परंपरांची शस्त्रे
किती पिढ्यांनी मूकपणाने स्वाधीन केली गात्रे
पराभवाची खंतही नव्हती इतकी शरणागती
ढकलीत होते बळे चितेवर, गर्जत मिरवत सती ।। १ ।।

हक्कांच्या घनघोर लढाया, आजवरि किती झाल्या
संकट येता आधारास्तव, किती मिळाल्या काठ्या
अपूर्ण तरीही प्रवास जोवर, दुबळी अंत:स्फूर्ती
भेदांच्या पल्याड नेतसे, अद्वैताची भक्ती ।। २ ।।

शब्दांमधूनी मिळते विद्या, त्यातून उमले नवदृष्टी
विचार तेव्हा मुरतो चित्ती, निर्भय होते मती
अर्थ नवा अन् तर्क हवा, ही जाणीव होता जागी
स्वत्वासाठी विश्वासाने पाऊल पडते पुढती ।। ३ ।।

## ८. सळसळणारे धवल तेज हे

सळसळणारे धवल तेज हे छाती काढून खडे
गरुडालाही झेप लाजवी गगन तोकडे पडे।।ध्रु.।।

सुपुत्र बनलो आज आईचे तोडुन फसवी नाती
स्वर्गसुखाची हसतच देऊ तिजसाठी आहुती
या मातीचे सुवर्ण करण्या श्वसना धार चढे।।१।।

पाजळलेली मशाल हाती उज्ज्वल परंपरेची
चक्र नियतिचे उलटे फिरवू आण तिच्या दीप्तिची
तिच्या प्रकाशी सुगम भासती भेडसावते कडे।।२।।

विश्वाचे हे विशाल अंगण नभ वरती खालती
चंद्रसूर्य तर सखे सोबती तारा बोलावती
तेज तयांचे प्राशुन धावू कल्पान्तापलिकडे।।३।।

मोहक सुंदर गोड मार्ग हे भुरळ मना घालती
व्यवहाराची सूत्रे पोकळ तोऱ्याने मिरविती
दिमाख त्यांचे दिपवू फेकुनि स्फूर्तिप्रभा चहुकडे।।४।।

ऊर्मि उमलत्या उरात अमुच्या भरारिची जरि असे
झिजल्यावाचुन सुवास दुर्लभ हेहि मना कळतसे
काट्यांवरूनी आज चालणे, गुलाब येतिल पुढे।।५।।

भास सर्वही विरुनी गेले ध्येयरूप उजळले
दुभंगलेले राष्ट्र उभविण्या अता विडे उचलले
नव्या प्रभूला पहा पूजिण्या पाउल पुढती पडे।।६।।

# ९. सोनियाचा दिवस दारी

सोनियाचा दिवस दारी, शतक अर्धे सरुनि जाई
जागृतांचे गीत हे, संजीवनाचा मंत्र गाई ।।ध्रु.।।

जाहले ते बिंदुवत् अन् सिंधुवत् आहे समोरी
ठाकता आव्हान, स्फुरते शौर्य पंखांना भरारी
वेधिका दृष्टी उद्याच्या नवयुगाचे स्वप्न पाही ।।१।।

मापुया अवकाश आणिक शोधु या अणुगर्भ ऊर्जा
मानवातच माधवाची बांधु या सानन्द पूजा
अमृताचे कुंभ ओतू लोकगंगेच्या प्रवाही ।।२।।

जोवरी सुकल्या मुखी त्या जीवनाची धार नाही
जोवरी शिणल्या जिवाला स्नेहमय आधार नाही
व्यर्थ तोवर स्वर्ग साती, व्यर्थ सगळी रोषणाई ।।३।।

रूप चित्ती मातृभूचे, कर्मपूजा मांडलेली
चेतनेची कोटिरूपे, एकसूत्री जोडलेली
सर्वही आपण प्रबोधक, मग उणे भाग्यास काही? ।।४।।

## १०. क्षितिज नवे मज...

क्षितिज नवे मज सतत बोलवी, साथीला सन्मित्र हवे
आज एकटा, अनघड जरि मी, मनात अंकुर हा उगवे
क्षितिज नवे रे, क्षितिज नवे ।। ध्रु. ।।

निद्रेमधुनी जागा होता नवाच मी मजला दिसतो
उलगडणारी दुनिया भवती मी मध्ये माझा नसतो
साखरझोपेमधली हसरी स्वप्नमालिका अवतरते
कठोर अवघड सारे सरुनी आसमंत होती हिरवे ।। १ ।।

चुटकीसरशी सुटती गणिते गूढ समस्या आकळती
शतकांमधल्या उग्र लढाया जिंकुनिया मी छत्रपती
ग्रहगोलांची भ्रमणे अगतिक आणिक नियती सर्व कळे
अज्ञानाचा तिमिर सरे अन् ज्ञानाचा सविता उगवे ।। २ ।।

हिरमुसलेले नुरले कोणी आणि पांगले जे रडवे
मलाच माझे रूप उमजता मित्र मिळाले सर्व नवे
मी न एकटा माझ्या सोबत विहंगमांचे भव्य थवे
सर्वांसाठी एकच गाणे प्रबोधनाचे हे उजवे ।। ३ ।।

## ११. आम्ही जाउच जाऊ

अदम्य अपुल्या आकांक्षांचे गीत आजला गाऊ
जिथे जायचे ठरले तेथे, तेथे जाउच जाऊ,
आम्ही जाउच जाऊ ।। ध्रु. ।।

नवतेजाप्रत नवक्षितिजांच्या दौडत दौडत जाऊ
क्षणभर सांगुनी मनिचे हितगुज स्वप्ने नव रंगवू
नवीन कवने, नव्या कहाण्या नवस्फूर्तीने गाऊ ।। १ ।।

नसति भाषणे जीवन ध्येये ही तर अमुची सारी
यत्न शिंपुनी फुलवू क्षेत्रे कर्तृत्वाची न्यारी
इतिहासाची दिशा पालटू महान मानव घडवू ।। २ ।।

कधी न रुसणे, कधी न रडणे,
ना कधी थकणे, सदा पुढे चालणे
एकचि निश्चय झाला अमुचा राष्ट्र पुन्हा उभविणे
दुर्गमतेची तमा न आम्हा पाऊल पुढेच ठेवू ।। ३ ।।

निश्चय, निष्ठा, नीती यांचे कंकण बांधुन हाती
व्रतस्थ होउनि व्यापुनि टाकू विश्वाच्याही मिती
विश्वविजेते हिंदुराष्ट्र ते पुन्हा जगाला दावू ।। ४ ।।

# १२. डोळे उघडून बघा गड्यांनो

डोळे उघडून बघा गड्यांनो झापड लावू नका
जे दिसते ते असेच का हे उलगडण्याला शिका ।। ध्रु. ।।

भवतालीचे विश्व कोणत्या सूत्राने चाले
कोण बोलतो राजा आणिक कुठले दळ हाले
प्रारंभी जे अद्‌भूत वाटे गहन, भीतिदायी
त्या विश्वाचा स्वभाव कळता भय उरले नाही
या दुनियेचे मर्म न कळता जगणे केवळ फुका ।। १ ।।

वाहून गेलेल्या पाण्याचा ढग बनतो तो कसा
बीज पेरता कसे उगवते, पाऊस येई कसा
चारा चरूनी शेण होतसे, शेणाचे खत पिका
पीक पेरता फिरूनी चारा, चक्र कसे हे शिका
जीवचक्र हे फिरे निरंतर इतुके विसरू नका ।। २ ।।

अणुरेणूंची अगाध दुनिया दृष्टीच्या पार
सूक्ष्म जीव अदृष्य किरणही भवती फिरणार
या सर्वांच्या आरपार जी मुक्तपणे विहरे
बुद्धि मानवी स्थिरचर सारे विश्व वेढुनी उरे
विज्ञानाची दृष्टि वापरा, स्पर्धेमध्ये टिका ।। ३ ।।

# १३. नव्या युगाचे...

नव्या युगाचे पाइक आम्ही तारे नवक्षितिजावरचे
निजरुधिराची आण वाहुनी रूप पालटू देशाचे ।। ध्रु. ।।

आद्यकवींनी चित्रियलेली भूमी ही सुजला सुफला
रूप तियेचे आज पाहुनी चीड चेतवी चित्ताला
सुजल-सुफलता पुन्हा निर्मिण्या कोटि कोटि व्यापू गगने
भागिरथीला प्रसन्न करण्या वाहू यत्नांची सुमने
घराघरातून मनामनातुन दीप चेतवू स्फूर्तीचे ।। १ ।।

यंत्रदेव तो पूज्य अम्हाला पूज्य अम्हाला वेदऋचा
विज्ञानावर भक्ति असुनही गंध मोहवी काव्याचा
पूजनीय तो उंच हिमालय पूज्य अम्हाला सागर हा
भव्यत्वाची साक्ष ज्यामध्ये पूजा त्याची करू महा
या सर्वांच्या पूजांमधुनी पूजन करू या शक्तीचे ।। २ ।।

समोर मूर्ती मातृभूमिची आज न काही प्रिय दुसरे
शुद्ध मनाचे कोंदण करुनी तिच्या रुपाचे जडवू हिरे
स्वयंप्रकाशित अम्ही काजवे दुष्ट ग्रहांवर मात करू
आकांक्षांच्या पूर्तीसाठी मृत्यूशीही होड धरू
त्यागपत्र हे आजच लिहिले अवघ्या जीवनपुष्पाचे ।। ३ ।।

## १४. पंख पसरुनी विहरे त्याला.....

रुळल्या वाटेवरती चाले भेदरलेला मठ्ठ गडी
पंख पसरुनी विहरे त्याला जाई तेथे पायघडी ।।ध्रु.।।

गृहीत असता जुने, पद्धती फार पुराणी ठरलेली
कितीही धावा चाकोऱ्यांनी चाके जखडुनि धरलेली ।।१।।

एक कल्पनालोलक हलता शब्दांना रोमांच फुले
भावसागरा भरती येता लीलासलिला लाख फुले ।।२।।

शब्दाश्मांच्या पलिकडचेही दिसती अंकुर रोज नवे
तिमिरातूनहि लख्ख दाखवी प्रतिभाचक्षू भावदिवे ।।३।।

प्रतिसृष्टी आकळते ज्याला प्रतिभास्कर तो भावकवी
लोकविलक्षण ज्याची दृष्टी त्याला सृष्टी रोज नवी ।।४।।

शब्दांची लय ल्यावी वलये अर्थकणांची उमटावी
पाताळाच्या तळास अलगद हिमशिखरेही जोडावी ।।५।।

कल्पक योजक सर्जक होता प्रश्नांमागे येई उत्तर
संवेदनशीलास भावते अकल्पिताचे अवघे अंतर ।।६।।

प्रत्येकाचे दैवी देणे खोदून लेणे मुक्त करी
अक्षरअक्षर मैत्रवैखरी योजक होता तूच हरी ।।७।।

प्रतिभाप्रांतांचा तू अतिथी सगळी दारे तुज उघडी
पंख पसरुनी विहरे त्याला जाई तेथे पायघडी ।।८।।

## १५. प्रबोधनाचे गीत आज हे

प्रबोधनाचे गीत आज हे मुक्त स्वरांनी गाऊ
पिढ्यापिढ्यांची दृढ चाकोरी ओलांडुनिया जाऊ ।। ध्रु. ।।

किती जानकी किती द्रौपदी पूर्वसुरींच्या गाथा
नारीच्या अश्रूंतून सजती आदर्शांच्या कथा
केवळ त्यांच्या पुण्यस्मृतींची नकोत कवने आता
नव्या युगाच्या, नव्या उषेची किरणप्रभा जागवू ।। १ ।।

घरट्याच्या चक्रात अडकते स्त्रीची अमूर्त शक्ती
अंत:करणा अंध बनविते परंपरांची सक्ती
विशाल दृष्टी आप्तजनांची बळ देईल या हाती
त्याच बळाने समाजपुरुषा समतामार्गे नेऊ ।। २ ।।

रुंद होत ती क्षितिजे आता प्रगतीसाठी किती
व्यवस्थापनी, राजकारणी, उद्योगी नच मिती
जी जी क्षेत्रे साद घालती यत्न तिथे पेरुनी
कस लावुनिया कर्तृत्वाचा ठसा नवा उमटवू ।। ३ ।।

साध्य जरी हे वाटे अवघड शक्य तिथे पोचणे
पूल उभविता मनामनांचे मार्ग सहज आक्रमिणे
याच ईप्सिताकरिता भेदून स्वार्थाची कुंपणे
आत्मशक्तीचे, पंख लेवुनी उंच नभांतरी जाऊ ।। ४ ।।

## १६. यापुढे यशाकडे...

यापुढे यशाकडे अखंड झेप घ्यायची ।। ध्रु. ।।
शक्ति-युक्ति-बुद्धिने सुजाण यत्न चालवू
संपदा समर्थता उदंड आम्ही मेळवू
सावधान पाउले जयाप्रतीच जायची ।। १ ।।

वज्रता विनम्रता तनूमनात बाणवू
स्नेहशील एकता निजांतरात तेववू
वीजवादळातही ज्योत ना विझायची ।। २ ।।

अजिंक्य झेप आपुली अशक्य शब्द नेणते
'मृगेन्द्रता स्वयं हि एव' मंत्र एक जाणते
सार्थ तो करू अशी शपथ ही वहायची ।। ३ ।।

विक्रमी कृती करू चला दिगंत हालवू
तेज मायभूमीचे उभ्या जगास दाखवू
चेतना स्वरातली उरात जागवायची ।। ४ ।।

## १७. रूप देश का बदलें हम

आते युग के ध्वजधारी हैं नये क्षितिज के तारे हम !
खाकर कसम रुधिर की अपने रूप देश का बदलें हम ।। ध्रु. ।।

आदिम कवि ने बड़ी बखानी भूमि यही सुजला सुफला
हालत उस की आज देखकर व्यथित चित्त बनता शोला
देखें सपने वही सुजलता, वही सुफलता लाने के
भागिरथी को प्रसन्न कर लें कष्टकुसुम अर्पित कर के
स्फूर्तिदीप फिर घर घर में मन मन में आज जलायें हम ।। १ ।।

यंत्र देव के पूजक हैं हम, पूजक वेदऋचाओं के
शास्त्री शास्त्रों के होकर भी मुग्ध रसीले काव्यों के
खड़ा हिमालय देव हमारा, देव समिन्दर गहन महा
बिम्ब भव्यता का जिस जिस में उपास्य मिलता हमें वहाँ
उन सब की पूजाओं में से बनें शक्ति के साधक हम ।। २ ।।

नयनों में है मूर्ति समायी प्यारी भारत माता की
शुद्ध मनोमंदिर में अपने करें स्थापना बस् उस की
स्वयंप्रकाशित जुगनू ह हम दुष्ट ग्रहों के प्रतिद्वन्द्वी
स्वप्नपूर्ति कर ही लेंगे हम मौत उठावे फिर आँधी
त्यागपत्र लिख दिया आयु का, उस प्रण को ना भूलें हम ।।३।।

('नव्या युगाचे' या गीताचा हिंदी अनुवाद)

## १८. विज्ञाने सजवू धरणी

देवाची जरि ही करणी, विज्ञाने सजवू धरणी
दीनअनाथांच्या आधारा यंत्र उभे ठाकेल जनी ।।ध्रु.।।

कितीही ढकला वरती तरिही धोंडा खाली गडगडतो
वाफ होउनी जाते पाणी ढग त्याचा कैसा बनतो?
इथला ढग तिकडे का जातो? वारा का जागा सोडी?
उंचावरती थंड हवा का? बर्फ का बने गिरिशिखरी?
पडत्या पाण्यावरती बनते वीज कशी सांगा मजला
याच विजेवर नव्या जगाचा डोलारा सारा सजला ।।१।।

एक ध्रुवावर बोले माणूस दुसरा ध्रुव ऐके कैसा?
इथे चालता खेळ, पाहतो जगभरचा माणूस कसा?
जिते जागते चित्र काढुनी पुन:पुन्हा बघतात कसे?
जग झाले मयसभा इथे तर ठोंब्यांचे होणार हसे
कुणाकुणाचे चलाख डोके थिटे पडे संगणकाशी
या जादूच्या दिव्यात राक्षस हजर सदा आम्हापाशी ।।२।।

जरि ईश्वरे रचला मानव परि तो रचतो नवदुनिया
मानवदेहाच्या कोड्याचा पुरा उलगडा होत तया
असे का, तसे का न असावे? कशामधुन हे काय घडे?
आज असे मग उद्या का तसे प्रश्न असा ज्या रोज पडे
ऐसे करता घडते ऐसे तैसे करता काय घडे?
प्रयोग करती जे शंकासुर तेच उद्याचे वीर बडे ।।३।।

# १९. शुभ्र सुगंधित...

शुभ्र सुगंधित पुष्पे आणिक शुभ्र सुगंधित मने
मातृभूमि तव चरणी याहुन अन्य काय अर्पिणे?
हे अमुचे सश्रद्ध समर्पण स्वीकारी वरदे
अमुच्या शुभव्रतांना आई, तुझे शुभाशिष दे ।। ध्रु. ।।

उपासनेला दृढ चालविणे ही अमुची साधना
दिव्यद्युतीला अवतरणास्तव करितो आवाहना
त्या तेजाने आई अमुचे अन्तर धवळू दे ।। १ ।।

केसरिया जोहार येथले इथली बलिदाने
'सर देईन परि सार न देईन' हे कणखर बाणे
असा वारसा पेलायास्तव वज्राचे बल दे ।। २ ।।

स्नेहाचा हृद्‌बंध हवा अन् शक्ति हवी आई
सकलांची सामर्थ्ये जडविल जी तुझिया पायी
तुझ्याच गौरवगानासाठी अतुल संघस्वर दे ।। ३ ।।

भविष्यवेधी स्वप्नदर्शिनी प्रतिभा आम्हा दे
रूप तुझे पालटण्यासाठी दृढतम बाहू दे
प्रेय-श्रेय ते सर्वच अंती तव पदि वाहू दे ।। ४ ।।

## २०. सुवर्णसाधना...

स्थितीचे जणु जाहले दास सारे,
श्रमाला कमी लेखती सर्वथा
मनीषा नसे नाही स्पर्धाप्रवृत्ती,
जगा जिंकण्याची न ईर्ष्या प्रथा
शरीरास आवेश कैसा चढेना
सुवर्णक्षणांची घडो साधना ।। ध्रु. ।।

इथे याच मातीत योद्धे नि योगी,
इथे मल्लविद्या, धनुर्वेद अस्त्र,
घडो तेथ क्रीडाप्रयोगी समर्थ
जिथे भीम झाले जिथे वायुपुत्र
पदी वेग बाहूत सामर्थ्य देना ।। १ ।।

जगाची भरारी पुढे झेप घेण्या
मनी संघवृत्ती खिलाडूपणा
सदा विक्रमांची क्षुधा वाढणारी
मिळो सर्व सन्मान वा वंचना
महत्कार्य सिद्धी तपस्येविना ना ।। २ ।।

मनी मुक्त होऊ जनी सर्व मित्र
गुणी नेटके सर्वदा ध्यासबद्ध
जणु गोकुळी श्रीहरी संघसाथी
लढाऊ सदा हासरे नित्यसिद्ध
बलानेच हो धर्म संस्थापना ।। ३ ।।

## २१. स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे...

नजरेपुढती वाटा खडतर हाताशी केवळ निर्धार
स्वप्न उद्याच्या उजळ दिसांचे जिद्दीने करुया साकार ।।ध्रु.।।

अजुनी अंधाराच्या डोही खोल बुडाले दिवे किती
गाळामध्ये कितीक रुतली चाके त्यांची नाहि मिती
परिस्थितीचे शाप असे हे कधी न रोखू मज शकणार ।।१।।

पिढ्यापिढ्यांचा नसे वारसा, नसती नमुने वा आधार
मनी भूक मोठ्याच यशाची मनात केवळ हाच विचार
मोह भोवती कितीही असु दे नेइन माझी नैय्या पार ।।२।।

माझ्याशिच स्पर्धा ही माझी, समाधान आनंद मनी
कुणी दिलेल्या आधाराची जाणिव हृदयी क्षणोक्षणी
उभी पाठिशी मूक माऊली जिने उपसले कष्ट अपार ।।३।।

परिस्थितीच्या अन्यायाचा पूर्ण उमलणे हा प्रतिकार
कशास डंका, कृतीच बोले, मी माझ्यासम घडविन चार
कृतज्ञतेचे फळ आकस्मिक नशीब माझे फळफळणार ।।४।।

## २२. हसरी शतवर्षे जयगान

उन्नत आत्मा, प्रसन्न मानस, शरीरही बलवान्
श्रवणवचन दृष्टीसह हसरी शतवर्षे जयगान,
हसरी शतवर्षे जयगान ।। ध्रु. ।।

समग्र रूचकर चौरस देशी हितकर नित्याहार
स्वयंश्रमाने देह चपळ अन् बळकट जे करणार
कुपथ्य चंगळ व्यसनांनी नच बाधित पंचप्राण ।। १ ।।

मैत्री करुणा मोद उपेक्षा शम दम मृदु उद्‌गार
सुखमय सहजीवन जनगणही जिवापार जपणार
प्रांजळ निर्भय निर्णायक मन संतत नवनिर्माण ।। २ ।।

हसत, गात, नवकल्प रचित जे सकलांसह जगणार
विश्वाच्या कर्त्याधर्त्याशी तन्मय जे होणार
नव्या पिढीचे नित्य जयिष्णू सर्वलोकसन्मान ।। ३ ।।

## २३. पाखरे भरारली

पाखरे भरारली निळी नभे झळाळली
पालवी नवी नवी तरूवरी थरारली
हासऱ्या सुरातूनी चालत्या पदातूनी
झेप घेऊन उसळली ही चेतना ।। ध्रु. ।।

हिचे आम्ही शुभांशु रे
सतेज रे, सुहास्य लास्य रे
युवमनी जी, संचारते, प्रकाशते
गती हिची, द्युती हिची, स्फूर्ती
क्षितिज बाहते धरेस क्षेम द्यावयास या, या ।। १ ।।

## २४. जे कर्तृत्वाने जिंकतील ही धरती

जे कर्तृत्वाने जिंकतील ही धरती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ।।ध्रु.।।

कुणि हसरे, रुसके, लाघवि कुणि लडिवाळ
कुणि स्पर्शु पाहती नभ हे नील-विशाल
कुणि अबोल, उत्कट, कुणि तर्काची धार
कुणि तिखट, तेज जणु शिवबाची तलवार
परि सर्वारूपी नटला तो जगजेठी
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ।।१।।

फुलण्यास यांजला माती संस्कारांची
प्रेमाचे पाणी, ऊब सूर्यकिरणांची
जिज्ञासा यांची शोधि अथांग, अनंत
अन् पराक्रमाला अपुरे यांस दिगन्त
विश्वाला भिजविल करुणा ऐसी चित्ती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ।।२।।

हे इतिहासाची नवीन लिहितील पाने
अशुभाची येथुन पुसतिल नावनिशाणे
हे नव्हेत छोटे, हे तर युगनिर्माते
हे मायभूमिचे भावी भाग्यविधाते
शौर्याने अपुल्या नमवितील जे नियती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ।।३।।

याहून कोणते श्रेय अम्ही इच्छावे?
वा अन्यप्रकारे भगवंतास भजावे?
राधा-मनमोहन अन्य कुणा मानावे?
अन् कोणावरूनी जीवन ओवाळावे?
धन-मान खरोखर तृणवत् त्यांच्यापुढती
ते अंकुर आम्ही वाढवितो तळहाती ।।४।।

## २५. नव्या ताकदीने नवे स्वप्न पाहू

नव्या ताकदीने नवे स्वप्न पाहू
लढाया नव्या जिंकण्या सज्ज बाहू
आम्ही सूर्यकन्या, नव्हे फक्त छाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ध्रु. ।।

जिथे ज्योत तेवे स्वयंनिश्चयाची
तिथे अंध तर्का मिळे मूठमाती
विवेके विचारे कृती नित्य व्हाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। १।।

जनी क्षेम चिंतीत सृजनी रमावे
कशाला वृथा भंजनाला भजावे
स्वयंप्रज्ञ तेजाळते दीप बनण्या
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। २।।

स्वत: उंच जाऊ, समाजास नेऊ
सदा भारतीला जयवंत ठेवू
अशी प्रेरणा लक्ष हृदयी रूजाया
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ३ ।।

कवाडे खुली शिक्षणातून व्हावी
प्रभा नारीची स्नेहरूपी दिसावी
असे शेकडो संघ एकत्र येण्या
स्वये सर्व सामर्थ्य हे मेळवूया ।। ४ ।।

## २६. आज प्रचीती द्या !

गिरिकुहरातिल गर्द बनातिल सिंहाच्या छाव्यांनो,
तिमिरपुरातिल कृष्णघनातिल तेजस्वी ताऱ्यांनो,
प्रलयंकर शक्तीची तुमच्या आज प्रचीती द्या
तुमच्या शुभकर सामर्थ्याची आज प्रचीती द्या ।। ध्रु. ।।

मूक मनांच्या कारागारी धुमसत जी चिनगारी
वीज होउनी कोसळु द्या ती उद्धत अंधारी
त्या भस्मातुन बहरुन येइल हिरवा स्वर्ग उद्या ।। १ ।।

शतकांपूर्वीची जयगीते अजुनि घुमत कानी
शतकांपूर्वी अखिल धरेला क्षेम दिले आम्ही
ते सळसळते पौरुष फिरुनी नसांत वाहू द्या ।। २ ।।

पवित्र मूर्ती प्रिय आईची दुभंग परि झाली
अमित संपदा अतुल वैभवे कुटिलांनी लुटली
गतकालाचे विषाद गौरव भविष्य घडवू द्या ।। ३ ।।

सर्व दिशांनी विकसित होवो व्यक्तिमात्र येथे
सर्वार्थांनी रत्नवंत हो क्षेत्रक्षेत्र येथे
या भूमीला सृजनांची नभपंखी स्वप्ने द्या ।। ४ ।।

समर्पणाची हाक जयांच्या हृदयाला कळली
अजिंक्य झाले राष्ट्र तयांचे अभेद्य बलशाली
सार्थकतेच्या परिसाने त्या जीवन उजळू द्या ।। ५ ।।

## २७. मनामनातून आज गर्जू दे...

मनामनातून आज गर्जू दे राष्ट्रशक्तीची ललकारी
साद घाल तू निजबाहूंना, मुक्त नभी अन् घेई भरारी ।। ध्रु. ।।

गतकाळाचे डिंडिम का हो उगाच पिटता, उरिपोटी
या शतकाचे साहस थिजले? स्फूर्तीला का ही ओहोटी?
'भाळी मिरवीन वांझ वारसा' पुरुषार्थाची का ही कसोटी?
संभ्रम का हा? बुद्धिभेद का? विद्ध मनाला तूच विचारी ।। १ ।।

कोटिकरांची उधळण येथे, भूमी सुजला सुफला ही
ज्ञान भक्तीच्या संयोगाने, प्रखर बुद्धिने शोभविली
संघटनेची चिन्‌गारीही मनामनातच रुजलेली
का ह्याची विस्मृती? कशास्तव आत्मशक्तीला आव्हेरी? ।। २ ।।

विचार आणिक विवेक चित्ती, जागृत व्हावी विजिगीषा
डोळ्यांना परि भुलवित आहे, मोहमयी ही अभिलाषा
सत्ता, स्पर्धा, भोग देहिचा, अनिर्बंध ही असे लालसा
धुंद मनाला कशी उमजावी आर्त हाक आहे दारी ।। ३ ।।

देशच माझा - माझी भूमी-माझे दैवत येथील व्यक्ती
हिच्याचसाठी माझा कण-क्षण, हिच्याकारणी माझी शक्ती
हीच स्पंदने जाण हृदयीची, एक मुखी हो अभिव्यक्ती
संघटनेच्या विराट हस्ते ध्येयसिद्धीचा याग करी ।। ४ ।।

## २८. विकसता विकसता विकसावे

विकसता विकसता विकसावे ।। ध्रु. ।।
घडविता घडविता घडवावे
मिळविता मिळविता मिळवावे
विजयप्राप्त असे तळपावे ।। १ ।।

मन विशाल समृद्ध करावे
मन प्रफुल्लसदाचि हसावे
मन विवेकबळे उमलावे
मन त्वरे जनपदी रमवावे ।। २ ।।

तपविता तपविता तपवावे
तपपुनीत शरीर करावे
तपवुनी प्रतिभे उजळावे
तपगुणे मन मना मिळवावे ।। ३ ।।

झिजविता झिजवता झिजवावे
झिजुनी जीवनि महायश घ्यावे
तनु झिजो जगती जणु चंदन
मन बनो विजयी अतिपावन ।। ४ ।।

वितरता वितरता वितरावे
जनमनी विपुल ज्ञान करावे
जनप्रचोदित असे घडवावे
जन सुसंघटनार्थ विणावे ।। ५ ।।

भरडिता भरडिता भरडावे
अरिजना भुइसपाट करावे
हटविता हटविता हटवावे
तुडविता तुडविता तुडवावे ।। ६ ।।

समकृती समकृती समकार्य
हृदयस्पंदन घडो मन एक
विमल हेतु स्फुरो नवनीत
विमल राष्ट्र घडो अभिजात ।। ७ ।।

# २९. *विश्वास हा मनीचा*

विश्वास हा मनीचा सांगू उभ्या जगाला
आम्ही रवी उद्याचे, अंधार भेदण्याला ।। ध्रु.।।

अन्याय, भ्रष्टतेला अमुच्या जगी न थारा
जे जे अनाथ त्यांना पंखात ह्या निवारा
जाणून मंत्र घेऊ द्रष्ट्या ऋषीवरांचा
देवत्व त्यात पाहू जो दीन गांजलेला ।। १ ।।

उधळून मेघ टाकू जलहीन गर्जणारे
घडवू सशक्त बाहू अविराम कष्टणारे
हा कोण? जात कुठली? खोडून छाप सारे
स्नेहार्द्र साद घालू साऱ्याच बांधवांना ।। २ ।।

उन्मत्त धाक कधि ना ढळवेल निश्चयाला
भुलवील ना धनाची राशी समर्पणाला
वज्रास भेदणारी उभवू अभिन्न हृदये
सामर्थ्य मेळवू या काळास जिंकण्याला ।। ३ ।।

ज्ञानासवेच तोलू विज्ञान स्रोत आम्ही
नवनिर्मितीस लागू स्मरणात ठेवू आम्ही
चारित्र्य शुद्ध भावा फुलवून अंतरंगी
सुकुमार चित्तपुष्पे अर्पून मातृभूला ।। ४ ।।

## ३०. विश्वास है हमारा (हिंदी)

विश्वास है हमारा ऐलान सबको कर दे
सूरज है कल के हम सब
अंधियारा दूर कर दे ।।ध्रु.।।

अन्याय भ्रष्टता को ना देंगे हम सहारा
जो है यतीम उनको हो दर खुला हमारा
आओ, समझ सकें हम, ऋषियों ने जो सिखाया
जो भी है दीन दुखिया - भगवान वो हमारा ।। १।।

बिखराही देंगे उनको बादल जो जल न ढोएँ
अविरत जो श्रम करे उन् हाथों को हम सँवारे
किस जात - धर्म की यह बाते है खोखली सी
भाई सभी है अपने सबको गले लगाएँ ।। २।।

अटूट प्रण हमारा ताकद मिटा न पाएँ
इतना नही है सस्ता धन से खरीदा जाए
जो वज्र भी न भेदे ऐसे जिगर हमारे
हम जुँझले समय से बल ऐसा प्राप्त कर ले।। ३।।

विज्ञान-ज्ञान दोनों हमको है खूब भाँते
हमे याद नित्य हो यह दुनिया को जब भी बदले
ऐसा चरित्र जिसपर अभिमान हमको नित हो
हम मातृभूमी की महिमा नित शुद्ध स्वर में कर ले ।। ४।।

(‘विश्वास हा मनीचा’ या गीताचा हिंदी अनुवाद)

# 31. O Lions !

O Lions young of mountain heights !
Brilliant stars of darkest nights !
That striking strength of yours - Show it now.
That blissful light of yours - Throw it now !
The ember smould'ring in silent hearts
Seize it and turn it into lightning darts
Burn the insolent darkness down
The ashes, tomorrow, will bloom in green.
That scalding power of yours - Shower it now !
The ballads that sing of glories past
Of the world that received its solace from us
Where many a mighty lived and lost
Yet thrill the minds and charge the hearts.
That matchless valour of yours - Show it now !
Mother's image, so dear to us,
Was, later, though, so painfully shattered
The golden coffers were robbed and scattered
Changing that gloom into brightness in future.
Is a beckoning challenge of yours - Meet it now !
Let each one bloom in his potential
Each walk of life be rich in every aspect
Let this land see creative visions
Soar on wings unto the farthest skies.
Such a lofty dream of yours - Dream it now !
Indomitable becomes, and strong, their nation
Whose hearts can leap up at the call for dedication
Fulfilled are their lives and alchemized golden
For they are offered a cause and a mission.
That esteemed destiny is yours - Follow it now!

(‘आज प्रचीती द्या’ या गीताचा इंग्रजी अनुवाद)

## ३२. असति का ऐसे कुणी?...

बहुत असती जे यशाचे मिरविती माथी तुरे
वैभवाची शीग चढता म्हणती ना केव्हा पुरे
यश-सुखाची मीठ मोहर मातृमुखी ओवाळुनी
मुक्त झाले जीवनी या असति का ऐसे कुणी ।। ध्रु. ।।

रेखिल्या परिघात ज्यांची रमुनी गेली मनमती
बहुत ऐसे घरकुलाच्या सुखद स्वप्नी रंगती
होऊनी नि:संग परि जे श्रमती विजनी काननी
हिंदुराष्ट्रा जे समर्पित असति का ऐसे कुणी ।। १ ।।

शिंपिती फुलबाग कोणी फुलविती वनवैभवे
रम्य उद्याने कुणाची गंध भरले ताटवे
बांधवांच्या आर्त हृदयी मेघसे ओसंडुनी
शिंपिती जे प्रेम अपुले असति का ऐसे कुणी ।। २ ।।

उजळती कोणी पसा अन् उजळती अंगण कुणी
उजळती देवालये अन् उजळती नगरे कुणी
त्रिभुवनाला उजळणारे प्रखर ते तेजोमणी
प्राणदायी जे प्रचोदक असति का ऐसे कुणी ।। ३ ।।

# ३३. ततः किम् ?

उमेदीत आरंभ हो जीवनाचा, कुलीनाघरी जन्म झाला ततः किम्?
मिळे गोमटे रूप, बुद्धी कुशाग्र, सुविख्यात शाळेत आला ततः किम्?
शिकूनि कला, शास्त्र, विद्या समग्र,परीक्षेत उच्चांक केला ततः किम्?
मिळे वैद्यकी, यांत्रिकीला प्रवेश, व्यवस्थापनी, शासनी वा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। १ ।।

कबड्डीत,खोखोत निष्णात झाला, नि फुटबॉल, टेनीस जिंके ततः किम्?
सतारीत, गाण्यात, नाट्यात रंगे मिळाल्याच सर्वत्र टाळ्या ततः किम्?
पडू लागली छाप संभाषणी अन् सभा जिंकिल्या भाषणांनी ततः किम्?
कथा, लेख, काव्ये प्रसिद्धीस आली, बहू छापुनी ग्रंथ झाले ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। २ ।।

विदेशी प्रवासास जाणे घडे वा तिथे राहणे नित्य झाले ततः किम्?
सुखे देखिली, ऐकिली, चाखिली अन् किती हुंगिली, स्पर्शिली ती ततः किम्?
बडी नोकरी वा निजी कारखाना पगारात, सत्तेत वृद्धी ततः किम्?
पदे भूषवीली पुढारीपणाची मिळाली समाजी प्रतिष्ठा ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ३ ।।

गुणी, गौर, सच्छील लक्ष्मीच जैसी अशी बायको लाभलेली ततः किम्?
गुणी, देखणा आणि कर्तृत्वशाली पती लाभला राजबिंडा ततः किम्?
फुलासारख्या हासऱ्या, गोजिऱ्या त्या मुलांनी घरा शोभविले ततः किम्?
घरी फ्रीज, टि.व्ही.नि सोयी सुखाच्या गडी, फोन, दारात गाडी ततः किम्?
क्षणाचीच आरास जाईल वाया जरी जीवनी राष्ट्रसेवा घडे ना ।। ४ ।।

अशा शर्यती चालल्या आंधळ्यांच्या तयामागुनी धावणे हे ततः किम्?
कुठे जात आम्ही? पुढे काय आहे?असा प्रश्न का हो पडे ना तुम्हाला?
जरी लोक येथील कोट्यानुकोटी कसे दैन्य देशात कोणी बघेना?
करू मातृभूमी जगी श्रेष्ठ ऐशी चला पौरुषाची प्रतिज्ञा करू या
असे दिव्य आव्हान हे विक्रमाचे जिणे राष्ट्रकार्यार्थ हो कांचनाचे ।। ५ ।।

# ३४. पेटली ज्योत विझणार नाही !

धगधगत्या त्या मशालीवर
मीही वात पेटवून घेतली
अप्रूपाचा हुरूप होता
हुशारलो... फुशारलो।

कधी कधी आच लागून
आतल्या आत शहारलो
मशालीचा आदेश आठवून
माझा मीच सावरलो।

आदेश होता
प्रकाशाचा कैवार घेऊन
अंधाराशी वैर करा
धाऊन जा वाऱ्यासारखे
तुटून पडा ताऱ्यासारखे ।

उंबऱ्याबाहेर पाऊल टाकलं
मनामध्ये आण स्मरून
अडीच विती भात्यामध्ये
एक मूठ वादळ घेऊन।

दिपून गेल्या डोळ्यांमध्ये
एक भव्य स्वप्न लेऊन
फुरफुरणाऱ्या ओठांवरती
भैरवाचे गाणे ठेवून
अन् हातामध्ये थरथरणारी
माझी इवली ज्योत तेवून
उतणार नाही, मातणार नाही
घेतला वसा टाकणार नाही।

कधी कधी रोरावत
धावून येते बर्फवादळ
आग्नेयाचे वायव्याचे
द्वंद्व सुरू होते तुंबळ।

इवली दिवली सांभाळताना
उडते माझी तारांबळ
पण 'तत्सवितुः' स्मरण करता
कुठूनसे येते बळ।
पालवलेली आशा माझी
भेदू बघते सूर्यमंडळ
प्रकाशयात्रा चालू होते
समोर ध्रुव ठेवून अढळ।

तमात देखील लुकलुकणारे
काजवे कधी खुणावतात
हिरवा पिवळा उजेड दाखवीत
दिमाखात गुणगुणतात
वादळाला भीत नाही
अशी शेखी मिरवतात।

जडावलेला वेडा जीव
काजव्यांवरती लुब्ध होतो
रसरशीत तेजोगर्भ
हाती असून विसरून जातो पण
उजाडायच्या आधीच जेव्हा

त्यांचा उसना उजेड संपतो
तेव्हा सत्य कळून चुकते
त्यांचे तेज वांझ होते।

यात्रा माझी सुरू होते
काळोखातही जपलेली
माझ्या हातची ज्योत बघून
मोहरलेले पतंग येतात
गुंजन करीत कुठून कुठून
याहून मोठे तेज त्यांनी
पाहिले नसते आधी कधी
म्हणून जातात वेडावून।

प्रकाशकांक्षी पंतगांचे
सोनपंखी रूप बघून
बिनदिक्कत अर्पणाची
त्यांची आतुर ऊर्मी बघून
कळत नकळत लळा लागतो
यात्रा थांबते, मुक्काम वाढतो।

पण दुरून कुठून पुकार येतो
खोल आतून हुंकार उठतो
भासाचा का घेतोस ध्यास?
पतंग जळेल, विझेल वात
मीलनाचे सुख कसले
चिरंतनाच्या अंधारात?
पतंगाची ओढ सत्य
पण ज्योत जळणे त्याहून सत्य।

अन् ज्योत माझी उजळते
यात्रा पुन्हा सुरू होते
ऐकले आहे कोणाकडून
मंथनाच्या कोलाहलातून
हलाहलाचा वारसा मिळतो
अमृताच्या पुत्रांसाठी
नीळकंठ व्हायचे असेल
कंठातच ताना जिरतील
ओठांआडच गाणी विरतील।

पण कुणी सांगावे?
– असेही होईल
गाणे गाणे स्फुरत राहील
स्फुरता स्फुरता गीताला त्या
हलाहलाचा डंख मिळेल
तांडवाचा ताल मिळेल
एवढे एक माहीत आहे
समिधेच्या जन्मा गेलो
इंधनाचे धन माझे
ज्वाळेमध्ये हसू बघते
चंदनाचे मन माझे।

म्हणून म्हणतो
नाळ काही तुटणार नाही
जातकुळी सुटणार नाही
पेटली ज्योत विझणार नाही।।

## ३५. वास्तुपूजन

या वास्तूच्या कणाकणाशी जडले माझे नाते
काशी माझी हीच आणखी रामेश्वरही येथे ।। ध्रु. ।।

श्रांत जिवाला, भ्रांत मनाला, करुणाघन बुद्धाचे मंदिर
शरदूरात्रिचे शांत शिवालय आश्वासन हे देते ।। १ ।।

पोलादाच्या नसानसांतुन, थिजला लाव्हा, भिजले वादळ
कोसळत्या बिजलीचे बनले मूर्त शिल्प लखलखते ।। २ ।।

विक्रम-वैभव-वैराग्याच्या, दिग्विजयी दूतांच्या नयनी
आजच जेथे दिव्य उद्याचे दर्शन मजला होते ।। ३ ।।

## ३६. उरात अमुच्या....

उरात अमुच्या अदम्य ईर्ष्या, चैतन्याला गगन थिटे
सामर्थ्याची ही ललकारी, लक्षमुखातुन आज उठे।। ध्रु. ।।

ध्येयासाठी उसळत जाता, या देहाचे भान कुठे?
तरुणांच्या धमन्यांत आजला, समर्पणाची आस उठे।। १ ।।

हनुमंताची अभेद्य काया, इंद्राचेही वज्र तुटे
खांद्यालागी भिडवा खांदा, संघटनेची साद उठे।। २ ।।

रिपुरक्ताचा ठाव नेमका, श्रीरामाचा बाण सुटे
मनात घुमती वादळवारे, 'हरहर' गंभीर नाद उठे।। ३ ।।

पिचून गेल्या अस्मानावर, तारुण्याचे तेज फुटे
'पराक्रमाचा विझतो वणवा', ही मातेची खंत मिटे।। ४ ।।

## ३७. मज श्रेय गवसले हो

हिंदुभूमीच्या गौरवात मज श्रेय गवसले हो
समर्पणाचे शुभ्रकमल हृदयात विकसले हो।। ध्रु. ।।

अहंपणाचे तुटता अडसर आत्मशक्तिचे विमुक्त निर्झर
दो तीरांना फुलवित फळवित हसत निघाले हो।। १ ।।

स्फटिकगृहीच्या दीपापरि मन प्रसन्नतेने ये ओसंडून
चिरंतनाच्या चिंतनात मग सहजचि रमले हो।। २ ।।

ध्रुवापरि दृढ ध्येयप्रवणता ऋजु समर्थता कार्यशरणता
बहुत शोधुनि हे जीवनस्वर आज उमगले हो।। ३ ।।

हवे कुणा घर? माझे त्रिभुवन
आप्तचि सगळे सुहृद प्रियजन
कोटिकरांनी जगदंबेने कुशित घेतले हो।। ४ ।।

## ३८. ऊठ भारता !

ऊठ भारता, आठव फिरुनी तेजस्वी इतिहास
गतवैभव ते मिळवायाचा, लागो तुजला ध्यास ।। ध्रु. ।।

तुला न भीती कळिकालाची
जागव श्रद्धा नचिकेत्याची
अशक्य तुज ना काही, असता आत्म्यावर विश्वास ।। १ ।।

करी गर्जना निर्भयतेने
अंतरिच्या त्या सामर्थ्याने
मोहतमातुन प्रकाशाकडे होवो नित्य प्रवास ।। २ ।।

त्यागातच सार्थक जन्माचे
करी स्मरण या आदर्शाचे
तुजसाठी ना जगतामधले कुठले भोगविलास ।। ३ ।।

विक्रम आणिक वैराग्याचा
संगम तुझिया ठायी साचा
त्याच संगमी पुण्य स्नान हे घडो सर्व जगतास ।। ४ ।।

हाक घालुनि मानवतेला
जागव तिचिया चैतन्याला
विजयध्वज तो अध्यात्माचा नेई सर्व दिशांस ।। ५ ।।

# ३९. गर्जोन उठे कथण्याते...

गर्जोन उठे कथण्याते जल आज सप्तसिंधूंचे
आ सिंधु सिंधु धरतीचे हे राष्ट्र हिंदू हिंदूंचे ।। ध्रु. ।।

रडल्या त्या धायी धायी अबला नरनारी जेव्हा
थरथरली तीर्थे गायी धर्मनीति बुडली जेव्हा
तलवार भवानी आई होती ना उठली तेव्हा
धर्माच्या आपत्काळी खड्गाचे कंकण ल्याली
रुधिराची चढली लाली राखिण्या स्वत्व हिंदूंचे ।। १ ।।

स्मरतो ना तेग बहादूर, धर्मवीर नरशार्दुल
गोविन्द गुरू तो शेर पुत्रास घालुनी मोल
'सर दिया ना दिया सार' तेजस्वी केले बोल
हा लेख असे रक्ताचा वज्रलेप झाला साचा
हृदयात नित्य जपण्याचा उद्घोष कोटी कंठीचे ।। २ ।।

जखडून शिवाचा छावा औरंगा बोले त्याला
इस्लाम करी स्वीकार झेल वा मृत्यूच्या धावा
जाणून दुष्ट तो कावा प्राणास अर्पिता झाला
ते तेजस्वी बलिदान तुज करिते बघ आव्हान
शाहिरा तुला रे आण गा गीत मुक्त कंठाने ।। ३ ।।

हिंदुत्व घोष जो उठला घनगर्जित झाली वाणी
ध्वज हिंदूंचा फडफडला पुलकित ही झाली अवनी
सन्यस्त वीर धर्माला विभवास नेईया जगती
हे वीर विवेकानंदा हे मूर्तिमंत पुरुषार्था
ही शौर्याची तव गाथा सांगते सप्त खंडात ।। ४ ।।

## ४०. तनूमनात...

तनूमनात एक ध्यान प्रिय महान हिंदुस्थान
हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान हिंदुस्थान ।। ध्रु. ।।

ऋषी मुनी तपोनिधी कितीक येथ जाहले
दिव्यदृष्टि–चिंतकांनी विश्वगूढ भेदिले
गुरुपदीच शोभतो प्रिय महान हिंदुस्थान ।। १ ।।

जाहली प्रसन्न येथ जान्हवी भगीरथा
सिद्ध सूर्य कोंडण्यास ब्रह्मपुत्र सर्वथा
यत्न हाच मंत्र देइ प्रिय महान हिंदुस्थान ।। २ ।।

सरेल दैन्य येथले सुबुद्ध कष्ट सिंचता
बहरतील वैभवे ध्यासबीज पेरता
शतयुगे अदीन हा प्रिय महान हिंदुस्थान ।। ३ ।।

असंख्य ज्योति चेतवून एक आरती तुझी
असंख्य सूर मेळवून एक अर्चना तुझी
हृदयपुष्प वाहिले पदी तुझ्याच हे महान ।। ४ ।।

# ४१. या माझ्या भारतदेशी

एकजीव उमदे व्हावे जनजीवन गावोगावी
या माझ्या भारतदेशी सुखस्वप्ने फुलुनी यावी ।। ध्रु. ।।

शेतात कोरड्या किसान गाळी घाम
पेरले उगवता हरखुन जाई भान
भरगच्च पिकाने पिवळे होई रान
बळिराजाची परि बाजारी धुळदाण
या भारतभूपुत्राच्या कष्टाला किंमत यावी ।। १ ।।

ही सागरवेष्टित भूमी सुजला सुफला
रखरखीत झाली ओलावा ओसरला
बोडके नागडे होता डोंगरमाथे
आटले झरे अन् सुकलेले पाणोठे
या सुकलेल्या रानात रुजवू या जीवनराई ।। २ ।।

गावात भांडती भाउबंद शेजारी
हे लोक निरक्षर कर्जाने आजारी
भाबडे भोळसट व्यसनांनी बेभान
मागास रिकामे शहरांचेच गुलाम
या गावकऱ्यांच्या गावी नवनवी उभारी यावी ।। ३ ।।

कान्ह्याच्या गावी भरले गोकुळ होते
गोपांच्या मेळी गोवर्धनबळ होते
कालिया पूतना कंस संपले सारे
यमुनेच्या काठी स्वातंत्र्याचे वारे
हरिकथा अवतरो हीच माझिया गावी ।। ४ ।।

## ४२. विश्वात सर्व शोभो...

विश्वात सर्व शोभो हा हिंदुदेश अमुचा
त्याच्याच पूजनाचा हा ध्यास अंतरीचा ।। ध्रु. ।।

नादातही नद्यांच्या वेदान्तसूक्ति हसती
इथल्या तरुलताही त्यागास पूजताती
सत्यासमोर असणे हा सूर्यफूल बाणा
नचिकेत निर्भयांचा हा हिंदुदेश अमुचा ।। १ ।।

वारा सदैव गाई स्वातंत्र्यगीत येथे
उत्तुंग पर्वतांचे उन्नत सदैव माथे
भूमी कधी न साही अपमान खंडनाचा
आसिंधुसिंधु अमुचा हा हिंदुदेश अमुचा ।। २ ।।

फुलवीत राही ईर्ष्या ज्वालामुखीत लाव्हा
प्रकटेल भूवरी ती काली सहस्रजिव्हा
परिहार दुर्जनांचा वरदान सज्जनांना
आतंक सप्तखंडी हा हिंदुदेश अमुचा ।। ३ ।।

नीलात नित्य जडवू कर्तृत्ववान तारे
प्रतिभेस जागत्याही नच ठाउकी किनारे
व्योमास व्यापु अवघ्या प्रज्ञेत ही भरारी
चैतन्य नित्य देई हा हिंदुदेश अमुचा ।। ४ ।।

यत्नात स्वप्न पाहू सामर्थ्य वैभवाचे
येथेच अवतरो की ते ब्रह्मतेज साचे
शतसूर्य चेतवोनी चिद्घोष आरतीचा
आकंठकंठ गाऊ हा हिंदुदेश अमुचा ।। ५ ।।

# ४३. शतकातुनि...

शतकातुनि द्रष्ट्यांचे स्वर निनादती
‘अग्रेसर हिंदुराष्ट्र हिंदुसंस्कृती’
असे स्वर निनादती ।। ध्रु. ।।

इतिहासा ज्ञात असे शौर्य येथले
यज्ञाग्नी सर्वप्रथम येथ चेतले
देशास्तव प्रथम दिल्या इथुनि आहुती ।। १ ।।

परदास्ये होते जधि राष्ट्र घेरले
संतांनी सद्विचार येथ पेरले
स्वत्वाची ठेवियली ज्योत जागती ।। २ ।।

स्वातंत्र्यास्तव कितीक अथक झुंजले
फाशीचे दोर कुणी हसत चुंबिले
रक्ताला चेतविती प्रखर त्या स्मृती ।। ३ ।।

वाढतसे ज्ञान इथे खडक फोडुनी
साकळल्या रूढींचे बंध तोडुनी
प्रतिभेला नित्य नव्या लाभती मिती ।। ४ ।।

ध्यासांचे ज्वालाबन आज उसळु दे
कर्तृत्वातून नवे स्वप्न उमलु दे
संगर हे आम्हि रथी अम्हिच सारथी ।। ५ ।।

# ४४. हिंदु ऐक्याची ध्वजा...

या निळ्या मोकळ्या अंबरी विहरते
सूर्यकन्येपरी हिंदु ऐक्याची ध्वजा ।। ध्रु. ।।

आर्षकालातुनी आर्यसंघातुनी
मुक्त जे गाइले सूक्त तेजस्वि ते
लहरताना दिसे या स्वरांच्या वरी ।। १ ।।

दुष्टनिर्दालना सुष्टसंरक्षणा
धर्मसंस्थापना चेतवी जी मना
कल्पवृक्षापरी छत्र माथी धरी ।। २ ।।

स्तंभिकेतळी हिच्या अखंड यज्ञ मांडिले
घेतली महाव्रते सहस्र प्राण सांडिले
ही असो महत्पदी वैभवाच्या शिरी ।। ३ ।।

क्षुब्ध लाट होउनी कधी नभी थरारते
हर्षमत्त होउनी कधी रणात नाचते
उधळिते घेउनी अग्निपुष्पे करी ।। ४ ।।

जिंकुनी दिशा दहा वाहु त्या हिच्या पदी
तेजप्राप्त हो असे कुणी न पाहिले कधी
हाच प्राण हेतु अन् ध्यास हाच अंतरी ।। ५ ।।

# ४५. अजिंक्य करू या जगतामध्ये

अजिंक्य करू या जगतामध्ये अपुला हिन्दुस्थान
शपथ घेऊनी सिद्ध जाहलो हाती घेऊन प्राण ।।ध्रु.।।

हिंदू म्हणुनी जन्मा आलो वेदांच्या सांगाती
सिंधूतुन अवतरली येथे पुण्यसलिल संस्कृती
अभ्युदय अन् निःश्रेयाची जननी हीच महान! ।।१।।

गगनाहुन व्यापक हो ठरला अपुला हिंदूधर्म
हृदयाच्या गाभारी जपले ज्ञान भक्ति अन् कर्म
चित्‌शक्तीला नाही उरले अद्वैताचे भान।।२।।

काळाला पचवून निर्मिला तेजोमय इतिहास
सत्यासाठी रक्त सांडले जागविले धर्मास
शौर्य वीर्य अन् समृद्धीचे सुखे गायलो गान।।३।।

परंपरेला साक्षी ठेवुन स्वप्न उद्याचे मनि अवतरले
विश्वामध्ये वैभवशाली हिंदुराष्ट्र हे अजिंक्य करणे
मानवतेला घालू आम्ही अध्यात्माचे स्नान!।।४।।

## ४६. हा उंच लहरतो...

हा उंच लहरतो गगनावरी ध्वज हिंदुत्वाचा।
सर्व दिशांनी मुक्त घोष ये हिंदू एकतेचा ।। ध्रु.।।

उज्ज्वल इतिहासाला स्मरून भविष्य रचताना
ध्येयपथावर निरलसतेने सेवा करताना
विजिगीषू प्रतिभेला नूतन स्फूर्ती देताना
एक तत्त्व अन् एक सत्य हा सुमंत्र हिंदुत्वाचा ।।१।।

ज्ञानाच्या नित प्रबोधनाची आकांक्षांच्या पूर्तीची
पिढ्या पिढ्यांनी अंगीकारल्या हिंदू जीवन रीतींची
हिन्दुभूमी ही नाही कुणाही द्रोही उपऱ्यांची
सवाल नाही अन्य कुणाच्या उसन्या स्वामित्वाचा ।।२।।

उत्साहाचे वाहू देत हे उफाळणारे झरे
कधी न थकल्या पंखांची ही भरारू द्या पाखरे
ब्रह्मशक्तीची उपासनाही उमटू द्या शतस्वरे
टणत्कारू द्या, घुमू द्या गगनी नाद धनुष्यांचा ।।३।।

या युवजनहो साद ऐकुनी पूज्य आर्यभूमीची
ज्योत पेटवूनी अंतरात मातेच्या अभिमानाची
विचार कसला? आता केवळ वाटचाल विजयाची
एक ध्यास हा निजभूमीच्या स्वत्व जागृतीचा ।।४।।

## ४७. आज आक्रीत घडलं

सइबाई ग राहिबाई ग आज आक्रीत ऽ घडलं
शिवगंगेच्या राहाळाचं गिऱ्हाऽण सुटलं ।। ध्रु. ।।

कोण कुठला कंजारभाट त्यानं लाविला बाई नाट
माझं शिवार हिरवा शालू त्याचा फाडीला जरीचा काठ
घरोघरच्या माऊलीचं बाई नशीब फुटलं ।। १ ।।

माझं माणूस माथेफिरू त्यानं आणली सवत दारू
सुटं चौखूर हा वारू त्याला कसा ग आवरू
सखि बहिणाबाई माझ्या आज औषध भेटलं ।। २ ।।

दारोदार झाली दारू वहावले बापलेक
भांडतंडती भावकी कोण करी देखरेख
बाई पोरांच्या ग रूपानं आज तुफान उठलं ।। ३ ।।

नोटंसाठी नादावलं नेहरू गांधींचं सरकार
माझ्या पोराबाळांसाठी त्यानं वाटीला विखार
झाल्या कष्टकरी जाग्या हाती निशाण धरलं ।। ४ ।।

## ४८. आता नाही मी एकटी

आता नाही मी एकटी, मला मिळाल्यात सख्या
आता एकमेळ करू, नाही राहाणार मुक्या।।ध्रु.।।

मी ग दारूड्याची बहीण, माझं माहेर तुटलं
माझं दु:ख झालं मुकं, पाणी नेत्राचं सुकलं
माझं माहेर होतं मोठं, मोठी माया मोठा झोक
भाऊ दारूत बुडाला, आता हासतात लोक।।१।।

मी ग दारूड्याची नारी, माझं कुंकू झालं फिकं
दावं गळ्यात बांधलं, झालं जनावर मुकं
रोज होती हाणामार रडारड परवड
कुणी सोडवा हो मला, थांबवा की पडझड।।२।।

मी ग दारूड्याची आई, पाळण्याची तुटं दोरी
कोण बाळाला उद्धरी, अवदसा येता घरी
द्वारकेच्या यादवांचा, यदुनाथही हरला
सोनियेच्या द्वारकेचा, ठाव नाही ग उरला।।३।।

## ४९. एकीचा हिसका दाउ द्या कि रं...

सोसायचं कुठवर या गरिबानं आता
सुखाचं चार घास खाउ द्या की
एकीचा हिसका दाउ द्या कि रं
दारूला दणका देउ द्या की ।। ध्रु. ।।

बाप आन् चुलता गुतलाय पुरता,
मामा न् मेव्हना उलथापालथा
सरपंच चेअरमन शाणासुरता,
भावकी न् गावकीचा टेकलाय माथा
मुळावर लाथा देउ द्या कि रं ।। १ ।।

नशिबाशि टकरा, बळीचा बकरा,
दुबळ्याच्या घराला खिंडारं सतरा
दळतोय आंधळा पीठ खातो कुतरा,
आवंदाचं जाउ द्या, म्होरच्याला सुधरा
आताच गनीम आवरा कि रं ।। २ ।।

कायद्याचं कुपान खातंया शेत,
पुढारी लाचार, माजल्याती भुतं
दिवसा हितं न् रातच्याला तिथं
कितीबी भरा ते रांजाण रितं
आताच्या आता हे जाउ द्या कि रं ।। ३ ।।

काहीबी सडतंय् पोटात पडतंय्,
डोक्यात चढताच इपरित घडतंय्
दारूच्या घोटात समदाच तोटा;
लबाड कंजारी लाटतोय् नोटा
त्यालाच सोटा देउ द्या कि रं ।। ४ ।।

कर्त मानुस नशेमधि कुजलं,
सुखाचं सपान जागीच इझलं
आईच्या आसवांनी घरदार भिजलं,
उद्याचं सुख यानं आजच इकलं
गाव सारं येडं तिथं ह्याचं काय चुकलं,
संगतीच्या सरणानं हातपाय भाजलं
आता पोरं तरी शाहाणी होउ द्या कि रं ।। ५ ।।

सरकारचं माथं जाग्यावर नाही,
देशी दारूची लायसनं देई
उद्याच्या पिढीला चावून खाई;
सडल्याती शहरं इलाज नाही
पन आम्हांला आमचं पाहु द्या कि रं ।। ६ ।।

एकीचा हिसका दाउ द्या कि रं, दारूची दुकानं जाउ द्या की
एकीचा हिसका दाउ द्या कि रं, दारूचं दुखणं जाउ द्या की
दारूला दणका देउ द्या की !

## ५०. ऐसे माझे नमुना गाव

गावासाठी जेथे झटती रंकासोबत अवघे राव।
अभंग निर्मळ जसा आरसा ऐसे माझे नमुनागाव।।ध्रु.।।

मुसळधार आभाळझडीने या मातीचे गेले फूल
रानखाटिकांना ही विकली अम्हीच माती, पडली भूल
गावपुढारी सफेद झाले मातीपासून गेले दूर
उन्हाळवेळी झरे आटता शिवार झाला हा भेसूर
नवे कराया तरीहि वाव, चला मिशीवर मारा ताव ।।१।।

फुटे भावकी तुटे गावकी ज्याचा त्याचा तो मुखत्यार
बिनकष्टाचे चंगळवादी शहरी पैसे झाले फार
रानमळ्यातील घामापेक्षा ठरला तगडा केवळ दाम
झगमगीत शहरी भपक्याला भुलले खेडे करी सलाम
सावरायला आहे वाव, शहरे फसवी, सोडा राव।।२।।

आम्हीच केली उजाड अमुची गावे दुर्लक्षित अनिवार
रानवनाची हिरवी छत्री जाळुन केला नग्न शिवार
कुणा न पर्वा गावशिवेची बघत राहिलो लूट अपार
आजवरी जे बिघडवले ते फिरुनी घडवू हिरवे गार
नवे कराया आहे वाव, एकजुटीने घालू घाव।।३।।

आभाळीची झेली गंगा शिवशंभूची रानजटा
आडचरातुन फिरता मुरुनी थबकुन राहील ऐलतटा
इथली माती इथे थांबली निर्मळ झाले पाणवहाळ
बारा महिने पाणवठ्यावर उगवे गंगा सांजसकाळ
करता आपण आहे वाव, नवे रचू या, होईल नाव।।४।।

## ५१. गाणे बचतगटाचे

मला गं बाई जाग आली । प्रबोधिनीने साथ दिली ।।
अज्ञान दूर मी मी सारीते । बचतगटाला सुरवात करिते ।।ध्रु.।।

आम्ही खेड्याच्या अडाणी बाया । कष्ट करोनी झिजती काया ।।
आया बायांना जाऊन सांगते। बचतगटाला सुरवात करिते ।।१।।

सर्व मिळोनी एकत्र येऊ। एकत्र येऊन विचार करू ।।
वीस जणींचा गट मी बनवते। बचतगटाला सुरवात करिते ।।२।।

व्याजाचा दर थोडाच ठेऊ। सावकार मारवाडी माघारी फिरवू ।।
सर्व जणींची गरज भागविते। बचतगटाला सुरवात करीते ।।३।।

शेती-भातात कष्ट करोनी। मुलां-मुलींना शिक्षण देऊनी ।।
हातचं राखुनी बचत करिते। बचतगटाला सुरवात करिते ।।४।।

बचत गटाचा हिशोब। ताईच्या हाती कागद दिला ।।
प्रबोधिनीचे आभार मानिते। बचतगटाला सुरवात करिते ।।५।।

# ५२. गांव माझा मी गावाचा

गांव माझा माझा माझा माझा ऽ मी गांवाचा ।।ध्रु.।।

गांव पाहावयासी गेलो ऽ गांवकरी होऊनि ठेलो ऽ
गांव राहावे निर्मळ ऽ अशी धरीन मी तळमळ ।।१।।

गांवासंगे फुलली शाळा ऽ व्यसनांना ती घालील आळा ऽ
गांवातील शेती भाती ऽ राहावी तिच्याशी दृढ नाती ।।२।।

गांवातील हो ग्रामस्था ऽ असावी  एकमेंका आस्था ऽ
एकी असेल आमुचे मूळ ऽ वादविवाद घालवू समूळ ।।३।।

गावाचा चालवण्या गाडा ऽ नको राजकीय राडा ऽ
गांव आणि गांवकरी ऽ नको तेथे सावकारी ।।४।।

नाते असू द्या हो जीवाचे ऽ ओस पडू नये घरटे साचे ऽ
शिकूया आणि गांवात टिकूया ऽ
शहरांत जाऊन नकोच वाकू या ।।५।।

खेड्यामध्ये भारत खरा ऽ सार्थ आपण करू हा नारा ऽ
प्रबोधिनीचा गाऊनी अभंग ऽ गांवी होऊया हो दंग ।।६।।

# ५३. गाव माझे कर्माचे मंदिर

गाव माझे कर्माचे मंदिर
देव आणि ग्रामस्थ हे स्फूर्तिचे सागर ।।ध्रु.।।

गावाचा करण्या सर्वांगीण विकास
लहान थोर निष्ठेने करूया प्रयास
एकमेका सावरूया देऊनि आधार ।।१।।

गावाचा चालवूनी शिस्तबद्ध गाडा
वाचू या सतत विकासाचा पाढा
विकासाने फुलवूया सगळी घरदारं ।।२।।

शाळा असावी विकासाची गंगा
शिकावे लहान थोर हाचि मंत्र सांगा
शिक्षणाने येईल गावाला बहर ।।३।।

व्यसने नसावी गावाला मारक
शिक्षणाचे व्यसन व्हावे सर्वांना तारक
संत वचनांनी भ्रम करू दूर ।।४।।

शेतीला पूरक उद्योग करावे
नसावी शत्रूता मन प्रेमाने भरावे
प्रेमाने जोडू मने देऊ एकमेका धीर ।।५।।

गावाची स्वच्छता हीच सर्वांची शान
समूळ घालवूया मनातील घाण
गाव स्वच्छ करूनिया रोग करू दूर ।।६।।

एकमेका करू सदा सावधान
गावाचा विकास हाचि जपू मंत्र छान
येथेच होईल सर्वांचा उद्धार ।।७।।

गायी-म्हशींनी फुलवूया गोठा
दह्या दूधाचा मग नसेल हो तोटा
तरुणांची तरुणाई फुलावी हेच सार ।।८।।

शक्तीची सर्वांनी करूनी उपासना
स्नेह आणि सहकार्याची करूया जोपासना
परस्पर आदराचा येईल मग पूर ।।९।।

वृक्ष वाढवूया मिळूनी लहानथोर
गावाची सुंदरता मग वाढेल चौफेर
पर्यावरणाला देऊ संघटनेने आकार ।।१०।।

सखा म्हणे धरावा हाचि एक ध्यास
गावाचा मग होईल चौफेर विकास
देशविकासाची चिंता होईल मग दूर ।।११।।

## ५४. गाव सुधारलं अन्

माझ्या बाई म्हायेराला, मायंदाळ मायाळू लोकं
गाव सुधारलं अन् समद्यांचं जाग्यावर डोकं ।। ध्रु. ।।

बायामान्सांना कामाचा भार, हिंडतोय बाप्या दारोदार
पोरांचा भारा न लेंढार फार, खान्या पिन्याची मारामार
हे नाय माहेरी घरी न् बाहेरी, समद्याचं वागनं चोख ।। १ ।।

निर्माळ गोठा निर्माल चूल, हसतंय खेळतंय निर्मळ मूल
गोठ्यात गाईन् दूधाचा पूर, बाई न् बाटली ठिवलीया दूर
म्हायेर असलं, सासर तसलं, लय बाई न्यारा झोक ।। २ ।।

तालीम देऊळ लेझीम ढोल, शिवार हिरवं तालात डोलं
भांडान तंटा चहाडी न्हाई, भुतं खेतं करणी न् कुभांड न्हाई
सावकार सरला मारवाडी म्येला, समदाच व्यवहार रोख ।। ३ ।।

बायाबाप्यांना कामाची घाई, म्हाताऱ्या गड्यांची भजनाची घाई
रिकामा मानूस पारावर न्हाई, मुलगी न् मुलगा साळंला जाई
सुनंला छळणं, कोर्टात पळणं, समदंच टळल्यात धोकं ।। ४ ।।

म्हायेर मोठं न् सासर खोटं, निस्तंच रडण्यात मायंदाळ तोटं
सासर सावरू भांडान आवरू, बाप्यांच्या जोडीनं घरदार सुधरू
गरीबी टाळू, दागिनं माळू, सोन्याला देऊन ठोक ।। ५ ।।

## ५५. धडधाकट घरधनी हवा !

धडधाकट घरधनी हवा न् बाळ गुटगटीत गोजिरवाणं
आई सोन्याची पुतळी जशी ही काया देवाघरचं लेणं ।।ध्रु.।।

ही मोकळी रानची हवा, झऱ्याचं झुळझुळ निर्मळ पाणी
माझ्या घामाची भाकर अर्धी, त्यावर मीठ मिरचीचं खाणं ।।१।।

गाव ठिपक्याची रांगोळी जशी, राऊळ गाजतंय रात्रंदिन
तालमीत तांबडी तरणी पोरं, न् साळंमधी बाळाचं चाललंय ल्हेनं ।।२।।

रानावनात हिरवी पानं, अवघा शिवार गातोय गानं
माझ्या कौलारू छपराखाली, हा संसार बावन्न कसाचं सोनं ।।३।।

चित्र मोठं छान त्यानं हरपलं भानं, गाव आणि घर याचं मांडिलं सपान
पण हाय हाय इपरित घडतंया सारं, अचानक उलटंच फिरतंया वारं ।।४।।

पुरी अडाणी राहिली लोकं, गरीबी घेतीया आपला प्राण
भुताखेतानं धरलंय डोकं, गावभर माजलीया मायंदाळ घाण ।।५।।

घरोघर ही पाटीभर पोरं, आपसात भांडत्यात लहानथोर
शेतीकाम करीना कुणी, पुढारी गिळतोय अवघं नाणं ।।६।।

जो तो आयतंच मागतोय खाणं, उठसूठ दसपिंड यात्रा न् लग्न
जरा काय झालं की इस्पितळ, उगीचंच औषध इंजेक्शन ।।७।।

असं झालं खरं पण बरं नाही सारं, समद्यांनीच करावा आता एक इचार
गाव निखरून निर्मळ करा, वाहू द्या सहकार्याचा झरा
आपणच आपलं डॉक्टर, औषध, वारा, पाणी न् गाणं ।।८।।

## ५६. परत फिरा रे

परत फिरा रे गावाकडती, घेउन नव विज्ञान
विहंगमांनो ! तुम्हाला मायभूमिची आण ।।ध्रु.।।

गावोगावी पिढ्यापिढ्यांची तीच दुर्दशा ठरलेली
दारिद्र्याचा शाप सनातन मुळी न आशा उरलेली
उजाड राने पाण्यावाचून भेगाळत ही पडलेली
कितीहि करूनी कष्ट आमची गणिते सारी चुकलेली
या रानांचा कायापालट, करील कोणी मांडून ठाण
या भूमीला देइल जोडून, नव्या युगाचे तंत्रज्ञान
वळविल पाणी, टिकविल माती, पिकविल मोती रानोरान
परत फिरा रे गावाकडती पेरा ताजे तंत्रज्ञान ।।१।।

गावशिवारे लुटण्यासाठी कितीक टोळ्या झटतात
पत्थर, पाणी, मनुष्य, माती सगळे अलगद लुटतात
भकास करिती गावपांढरी विकास ऐसे देऊन नाव
राजकारणी हातचलाख्या निव्वळ चोरा येतो भाव
शहरी भपका भुलवित जाय, गावकुसातून काढी पाय
पुन्हा कुणी तरी म्हणेल काय, पवित्र माझी काळी माय
इथे पराक्रम हिरव्यारानी, इथेच उद्यम, इथेच मान
परत फिरा रे गावाकडती नवे निर्मिण्या तंत्रज्ञान।।२।।

जुन्या पुराण्या प्रथा पद्धती घट्ट उराशी धरणारे
रीतीभाती जुन्या त्याच त्या मठ्ठपणे अनुसरणारे
अज्ञ समजुती वेडी वैरे चिवटपणे मति धरणारे
असे लोक हे खेडोपाडी उत्तम तेच विसरणारे
तर्काचा घेऊन वसा, शास्त्राचा उमटवी ठसा
नवे व्यवस्थाशास्त्र दिसे, लोकसंघटन तंत्र असे
घेउन येवो कुणी विवेकी सुपुत्र फुंको येथे प्राण
परत फिरा रे गावाकडती घेउन उजवे तंत्रज्ञान ।।३।।

## ५७. मी परावलंबी नाही

मी माझ्या पायावरती ही उभी नव्याने बाई
मी परावलंबी नाही, मी परावलंबी नाही ।। ध्रु. ।।
या जिण्यास बाईच्या गं हे दळीत होते जोते
माझ्याच घराच्या आत मी बंदिवान का होते?
मी मुक्या गुराच्यावाणी या घरात जखडुन होते
मी कधीच नव्हते बाई ओलांडुन गेले जोते
पण कुणा ठावकी कैशी मी बदलुन गेले बाई ।। १ ।।
घर शेतकऱ्याचे माझे, कर्जाचे झाले ओझे
घरधनी दीनवाणा हा, घर सावकार हा मागे
पिऊनिया धुंद हा बाप्या, शेतात राबते बाई
पोरांची सुटली शाळा, कनवटीस कवडी नाही
इज्जतीत घर राखाया मी बचत गटाला जाई ।। २ ।।
ही इथून मागे सारी बाप्यांची दुनिया होती
बाईला व्यवहाराची माहितीच कसली नव्हती
जरि इथली झाशीवाली, इंदिराबाई ही इथली
तरी घरोघरी एकाकी भारतीय महिला दबली
शिकुनिया मात्र ही आता पुरुषांच्या पुढती जाई ।। ३ ।।
दुनियेच्या पोटामध्ये लई उलथापालथ झाली
कुणि राजा उरला नाही कुणि गुलामदेखील नाही
मांडीला लाऊन मांडी पाटलास धनगर बोले
समद्यांना समदे रस्ते आताच खुले ग झाले
जनतेची आली सत्ता बोलती जाहली बाई ।। ४ ।।
मोलाने राबुन रोज मी कवडीकवडी केली
दरमहा वाचवुन पैसे मी गटात शिल्लक केली
हा मैतरणींचा मेळा मज रोज देतसे धीर
उद्योग नवे मी शिकले, अन्याय रोखले पार ।।
मी पती, मूल, घर, गाव या साऱ्यांची उतराई ।।५ ।।

## ५८. युगांतराचे अग्रदूत व्हा रे !

विवेकवाटेवरि आनंदे ध्येय गाठणारे
नवयुवकांनो युगांतराचे अग्रदूत व्हा रे ! ।।ध्रु.।।

जरी पुरातन आणि वैभवी भारत हा होता
लयास गेली साम्राज्ये ती परक्यांनी लुटता !
दीन दरिद्री अज्ञानी जन दु:खांनी पिचले
त्यांच्यासाठी कळवळणारे कुणि न कसे उरले
उरात हळवेपण ज्यांच्या ते बदलणार सारे
नवयुवकांनो युगांतराचे अग्रदूत व्हा रे ! ।। १।।

केवळ करुणा असून अपुरी मार्ग निघायाला
उपाय सुचणे आणि साधने हवी जुळायाला
इतरांपेक्षा उजवी अस्त्रे शास्त्रे माणुसबळ
दारिद्र्याचा अंत खरे तर या सर्वांचे फळ
सुचतील ज्यांना नवी प्रमेये उघडण्यास दारे,
नवयुवकांनो युगांतराचे अग्रदूत व्हा रे ! ।।२।।

करुणा प्रज्ञा सर्वसाधने असूनिही भारी
अगणित येती नित्य अडथळे, भेटतात वैरी
देश बांधवांच्या दुर्गतिची अखेर साधाया
अदम्य इच्छा, मित्रमंडळ हा एकमेव पाया
कितीही अवघड मार्ग तरी जे अथक चालणारे
नवयुवकांनो युगांतराचे अग्रदूत व्हा रे ! ।। ३।।

# ५९. शिवभूमि आजला...

सांगा हो, सांगा
ही नवलाई, ही स्फूर्ती येथे कसली?
ऐका हो, ऐका हो
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली!।।ध्रु.।।

हा चकित थबकला गुंजवणीचा ओघ
हो काय वर्तले? पुसती विस्मित मेघ
वरुषा शतकांचे मौन सोडुनी अपुले
ही पर्वतराजी हळूच हसुनी वदली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली!।।१।।

स्मरला सर्वांना तो शिवमंत्रित काल
तो ध्यास भारल्या श्वासांचा लयताल
ती रक्तामधली सळसळ फिरुनी येथे
नवरूप नवे आकार घेऊन आली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली! ।।२।।

हो उदंड येथे नीतिमंत श्रीमंती
या घराघरांतुन वसो क्षेम-सुख शांती
आनंदवने भुवने उभवू या येथे
या संकल्पासह पदे रोविली पहिली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली!।।३।।

श्रम उद्योगांचे कल्पतरू फुलवावे
हे स्फुरण येथुनी दिशांतराला जावे
शिवभूमी सुजला सुफला व्हावी म्हणुनी
ही शपथकंकणे आज करी बांधियली
शिवभूमि आजला नवेच लेणे ल्याली।।४।।

## ६०. शीव ही ओलांडुन जाणार !

ही गगनविहारी रानफुले, ही गावकुसातिल शूर मुले
हे रानवनाच्या मातीमधले उत्सुक नव हुंकार
ओलांडुन जाणार, शीव ही ओलांडुन जाणार ! ।। ध्रु. ।।

शतशतकांच्या चाकोऱ्यांनी, घट्ट बांधली नशिबे ज्यांची
आज पाहुनी दुनिया, त्यांना स्वप्ने पडती भव्य उद्याची
पिढ्यापिढ्यांची दरिद्रताही जखडु न त्या शकणार
ओलांडुन जाणार, शीव ही ओलांडुन जाणार ! ।। १ ।।

पाठीशी नच कोणी ज्यांच्या, कळति न वार्ता मुळी जगाच्या
स्पर्धेचे निर्दय जग तुडवी, तरी उमेदी अभंग ज्यांच्या
फुरफुरणाऱ्या भुजा जगाला आव्हाने देणार
ओलांडुन जाणार, शीव ही ओलांडुन जाणार ! ।। २ ।।

नवे शिकाया नाही अडसर, भय नाही ना काही दुस्तर
लाज असूया आळस मत्सर, दुबळेपण सोडून दूरवर
सामर्थ्याची चुणूक आम्ही दाखवून देणार
ओलांडुन जाणार, शीव ही ओलांडुन जाणार ! ।। ३ ।।

## ६१. एक दिलानं नांदायचं हाय !

घरात बेकी, दारात बेकी, बेकीचा पाढा आता घोकायचा नाय
एकीचं गुपित जाणून जगात, एक दिलानं नांदायचं हाय ! ।।ध्रु.।।

कथा न् कीर्तन, पुराणातली वांगी
समद्यात एकीची जपलीया सांगी
आपल्याच डोक्यात बेकीच्या खुळानं
भुतागत नाच ह्यो मांडलाय काय?
बेकीच्या नादानं, भांडान-तंट्यानं
कुणाचं भलं कधी झालंय काय? ।।१।।

निर्मळ मनाची निर्मळ वाणी
समद्यांच्या भल्याची कळकळ मनी
आपल्याच कष्टानं, हिकमत, हिमतीनं
आपलंच रूपडं सुदरायचं हाय
काजळी लोटून, बावन्नकसाची
झळाळी चमक उजळायची हाय ! ।।२।।

इथं मराठेशाही गर्जत नांदली
शिवबाच्या बोलावर इमानं झुंजली
नुसत्याच घोषणा वारसदारीच्या
पोकळ गमजा आता चालायच्या न्हाय
दुफळीच्या ठिणगीनं दौलत सारी
क्षणात वणव्यात उधळायची काय? ।।३।।

यंत्रयुगाचा आलाय जमाना
ट्रॉली न् ट्रॅक्टर चाले दणाणा
टी. व्ही. न् कम्प्युटर, मोबाईलची भाषा
कशाला घाबरायचं कामच काय?
रामाच्या सेनेची शपथ आम्हाला
हनुमान उडी आता मारायची हाय ! ।।४।।

# ६२. संघर्ष करू, सहकार्य करू

संघर्ष करू, सहकार्य करू, नवजीवनमार्गी ध्यास धरू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।ध्रु.।।

आयुष्य असे फरफटणारे, मंजूर नसे येथून पुढे
भवितव्य उजळ होणार कधी, हा प्रश्न मनाला सतत पडे
कोणी न दुजे वाटते खडे, आम्हास रडे अमुचेच नडे
मग अस्मानी आव्हान बडे, हे हसतमुखाने पार करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।१।।

आम्हास अम्ही लेखता कमी, अडवील कसे दुनियेस कुणी
चालते जयांची मनमानी, त्या पुरुषांना मानले कुणी
दुनियेत बरोबर नरनारी, येथेच अशी का शिरजोरी
आम्हीच शिकू, स्पर्धेत टिकू, मिळवून मान मग घरदारी
जर अम्हाबरोबर मैतरणी, अडचणी खरोखर दूर करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।२।।

कर्जात बुडाला शेतकरी, पोरांस नोकरी ना दुसरी
बेबनाव गावागावात, एकीचे नाव न कोण करी
हे पुरे अशिक्षित गावकरी वळणात जुन्या, संपले तरी
मग राजकारणी बहकावी, गावास लुटाया ढोंग करी
हे असे खुंटता गाव, चला गं प्रपंच गावाचाहि करू
या गावपांढरीच्या उद्धारा गगनधरित्री एक करू ।।३।।

## ६३. स्वप्न पाहूया उजळ उद्याचे

स्वप्न पाहूया उजळ उद्याचे
काळोखावर घालुनी घाव
गावाकडची आम्ही लेकरे
भीती आम्हाला कसली राव? ।।ध्रु.।।

शिवार अमुचे हिरवे रान
झरे मोकळे झुळझुळ गान
निसर्ग अमुचा आम्हीच राखू
ओरबाडण्या देऊ न वाव ।।१।।

शक्ती–भक्तीचा मेळ आगळा
शिव–तुकयाची आण मनाला
तालीम – देऊळ दोन्ही घडवून
लंघून सीमा पुढेच धाव ।।२।।

कष्टांना ना भिणार कधीही
रगडून वाळू काढू तेलही
जगी कुठेही गेलो तरीही
स्मरून जगवू, सजवू गाव ।।३।।

आज जरीही हाती अमुच्या
माय काळी अन् काठी–बरच्या
ह्याच मुशीतून कातळ फोडून
शुद्ध जळाला देऊ रिघाव ।।४।।

## ६४. *आमंत्रण* (हिंदी)

अब न रहेगा पीछे कोई, रण का आमंत्रण आया
युगोयुगों से आज, अभी यह अवसर आया रे आया।। ध्रु. ।।

आज अमावस की यामिनी को पूनम का-सा चाँद मिला
आज हमारे नयनों को सौ सपनों का संसार खुला
आज हमारे अरमानों की झंझा ने सूरज चूमा
बाँहों में अब अचल पंख का उभरा उमडा ज्वार नया।। १ ।।

गूँज उठा है आसमान अब नवयौवन के नारों से
शुरू हुअी है संकल्पों की मुलाकात अब तारों से
चपल पगों की आहट पाकर भाग रहा है अँधियारा
सजल दृगों की किरणें पीकर हँसती पतझर की माया।। २ ।।

इंद्रचाप है सज्जित कर में भूमंडल अब डोलेगा
सुनकर ध्वनि भगवान् स्वयं भंडार स्वर्ग का खोलेगा
देख हमारे तप को माँ पर तुष्टिवृष्टि बरसाएगा
इसीलिए हम मतवालों ने मस्त तराना छेड दिया।। ३ ।।

## ६५. आव्हान हे ज्योतिंना

आव्हान हे ज्योतिंना कि या
मातृभूमिपूजनास या, या प्रकाशसाधनेस या ।। ध्रु. ।।

भूमि ही महान धर्मधारिणी
तत्त्वरत्नवैजयंतिशोभिनी
अभयदायिनी अनयवारिणी
रुद्र ही सौम्य ही स्नेहदा
सगुण मूर्त आदिशक्ति मोहिनी
चिरयशस्विनी ही प्राणवाहिनी
विजयिनीस वंदिण्यास या ।। १ ।।

दैन्य दुरित स्वार्थ नामशेष हो
धर्मतेज मातृमुकुट शोभवो
अचल भक्ति हो अमित स्फूर्ति हो
धवल कीर्ति हो सर्वदा सर्वदा
अंतरात पेटवू विजीगिषा
जीवनास एकमेव ही दिशा
स्वप्नपूर्ति पाहण्यास या ।। २ ।।

पूर्व दिव्य आज फिरूनि आठवू
रम्य भाविकाल चित्र रंगवू
यत्न सेतुनी मार्ग घडवुनी
ध्येयसाधनेची करू सांगता
एक एक अंकुरास पालवू
तेजसाज आज त्यास लेववू
असित अर्घ्य शिंपण्यास या ।। ३ ।।

ध्येयसूर्य ना कधीहि मावळो
की अफाट नभ वरून कोसळो
कंटकातुनी वा फुलांतुनी
मार्ग शोधुनी आक्रमू आक्रमू
थको कधी न त्राण पावलातले
गळो कधी न धैर्य अंतरातले
अमिट हास्य उमलवून या ।। ४ ।।

## ६६. खळखळ धावत...

खळखळ धावत फेसाळत हा सागर उसळत येतो
मर्यादांना उल्लंघुनि नव आव्हाना घेतो ।। ध्रु. ।।

धवलगिरीच्या उंच उंच शिखरांचा बांध न ज्याला
प्रलयंकर मरुताची आहे साद जवाना तुजला ।। १ ।।

विक्रमगाथा इतिहासाच्या पानोपानि जयांची
त्या रणवीरा नमन करोनी धाव पुढे घ्यायची ।। २ ।।

आकर्षण गुरुतम धरतीचे सहज लीलया भेदी
विज्ञानाची गरुड भरारी तिच्यावरी तव कडी ।। ३ ।।

मर्यादांनी मर्यादुन? छे !! त्यांना उल्लंघुनी
पुढे पुढे चालणे असू दे हेच ध्येय तव मनी ।। ४ ।।

## ६७. आम्ही उसळत्या लाटा

आम्ही उसळत्या लाटा चैतन्य सागरीच्या ।। ध्रु. ।।

आम्ही सोत्कंठ भूमिच्या अंकुरल्या आकांक्षा
आम्ही पोलादी पंखांनी झेपावतो दशदिशा
आम्ही अमृतकलश अर्पितो पदी आईच्या ।। १ ।।

आहे ज्वालांशी फुलांशी प्रखर कोमल नाते
आहे तेजस्वी संयत अमुच्या खड्गाचे पाते
दिसो दुरित कोठेही कोसळू मस्तकी त्याच्या ।। २ ।।

आम्ही प्रसन्न पुष्पाच्या उमलत्या पाकळ्या
आम्ही आदित्य तेजाच्या धाकुल्या किरणकळ्या
देवभूमिच्या पूजेत उजळू ज्योती प्राणांच्या ।। ३ ।।

## ६८. तेजस्वी गतिशील संघटन

सहा समस्या, एकच उत्तर संघटनेविण सारे दुस्तर
तेजस्वी गतिशील संघटन सर्वदूर फलदायी सत्वर ।। ध्रु. ।।

उद्यम व्हावे यंत्रज्ञानें शास्त्रशोध फलदायी व्हावे
भरभरून उत्पादन व्हावे त्यासाठी जन जुळुनी यावे
संघटनेविण होणे नाही समजुन घेऊ चला खरोखर ।।१ ।।

फुलाफळांचे रानवनांचे तगड्या हसऱ्या गावकऱ्यांचे
धनधान्याचे दुधामधाचे गाव सजावे पुनश्च साचे
सजीव त्यांचे लोकसंघटन सर्वाआधी हवे तेच तर ।।२ ।।

बंधुभाव अन् समानतेचे असु दे नाते नवे समंजस
समरसता अन् अभंग एकी ज्या धर्माने होते बळकट
एकजात जे घट्ट जोडते हिंदुपणाचे सूत्र निरंतर ।।३ ।।

भारतभूचे कसे प्रशासन परराष्ट्रांशी कैसे बंधन
कसे जागतिक संस्थाचालन कसे न्यायसंस्था संचालन
या सर्वास्तव हवे संघटन दूरदृष्टिचे आणि उच्चतर ।।४ ।।

भारतभू स्वातंत्र्यसंगरी कोण कालचे होते रिपुजन
कोण आजचे आणि उद्याचे, कसे सैन्यदल करण्या रक्षण
या सर्वांची कशी बांधणी अवलंबुन असते कोणावर ।।५ ।।

## ६९. सपने छोडें? (हिंदी)

पग पग पगले कहे गए तो
हम क्या अपने सपने छोडें? ।। ध्रु. ।।

यौवन की नव उमंग लेकर
उरके भीतर आग लगाकर
आसमान के फटे चीथडे
फिरसे चले जुटाने हैं, अब
पग पग पगले कहे गए तो
हम क्या अपने सपने छोडें? ।। १ ।।

नवल स्फूर्ति के गान रचाकर
साँसों का संगीत बनाकर
स्पन्दन का चिर ताल दिलाकर
गगन भेदने निकले हैं, अब
गली गली गूँगों की है तो
हम क्या अपने गीत मरोडें? ।। २ ।।

मरू में नन्दन चले बसाने
चाहे जग अटकावे रोडे;
चिन्ता दुनिया के घर की लें
घर के बाहर निकले है, अब
पग पग ठोकर यही हाल तो
हम क्या अपने पग ही मोडें? ।। ३ ।।

किसने कलियों का वर चाहा?
किसने चाही मिट्टी दौलत?
रंग-रूप-रस-शब्द-स्पर्श से
भरे विश्व को भुला दिया, अब
पल पल माँगे त्याग भला तो
हम क्या अपना प्रण ही तोडें? ।। ४ ।।

## ७०. संघटना हे सूत्र बनावे

निर्भयता बळ आस्था यांचे एकी हे दैवत समजावे
जे जे वंचित त्यांच्यासाठी संघटना हे सूत्र बनावे ।। ध्रु. ।।

भरभरून मी धन मिळवावे, जग जिंकोनी घर सजवावे
अपयश चिंता अपमानांचे दिवस दरिद्री दूर सरावे
आप्तेष्टांच्या विधिलिखिताचे काळे वास्तव पूर्ण पुसावे
उघड्या डोळ्यांनी हे दुर्लभ स्वप्न साजिरे कसे बघावे ।। १ ।।

भवतालीची पिसाट दुनिया अफाट गतीने धावत आहे
विश्वाच्या अंताला वेढुनी गणिती प्रज्ञा वाढत आहे
उद्योगांची चौखुर चक्रे रोज जिंकिती नवीन गावे
विज्ञानाच्या विस्फोटातही अज्ञ जनांनी कसे जगावे ।। २ ।।

दुरावती जन तुटकपणाने जो तो वेची अपुले नाणे
रानदांडग्या शर्यतीमध्ये चिरडुन गेले चिमणे गाणे
एकाकी जन दुर्लक्षित जन आप्त एकमेकांचे व्हावे
केवळ आभाळीच्या देवा भिउनी कोणी किती भजावे ।। ३ ।।

आजवरी जे भिउन राहिले पूर्ण अडाणी दुबळे झाले
परस्परांचे पाय ओढुनी होते तेथुनी मागे आले
एक जयांचे दुखणे त्यांनी समदु:खी बंधू समजावे
आणि एकता हेच आपुले याच्यापुढती दैवत व्हावे ।। ४ ।।

## ७१. हे आनंदी गाणे...

मायभूमिच्या वाऱ्यासंगे झेपावत जाईल आपुले
हे आनंदी गाणे, हे आनंदी गाणे ।। ध्रु. ।।

उसळुनि येता हृदयामधुनी उत्साहाचे झरे
पराक्रमाला माथ्यावरचे अथांग नभ अपुरे
अवकाशाला जिंकुनि येतिल अपुली विजयी याने ।। १ ।।

श्रमता आपण हिमगिरिचे ते वितळतील हिमहिरे
मरुभूमीवर उभी राहतील विभवे सुखमंदिरे
सळसळणाऱ्या शेतांमधुनि हसेल हिरवे सोने ।। २ ।।

शंका कसली? किमया असली ! घडवू या हातांनी
सानवयातच स्वराज्यतोरण बांधियले शिवबांनी
हसतच पेलू नव्या युगाची नवी नवी आव्हाने ।। ३ ।।

# ७२. हे गाणे मुक्त मनांचे

हे गाणे मुक्त मनांचे हे गाणे मुक्त स्वरांचे
उलगडते यातून सहजी जे स्पंदन युवहृदयांचे ।। ध्रु. ।।

स्वच्छंद खगासम वाटे नभी उंच भरारी घ्यावी
मारता सागरी सूर ती गूढे उकलून यावी
प्राणांत वसावे धैर्य स्वप्नांस सत्य करण्याचे ।। १ ।।

कोसळत्या धारांसंगे सृजनाची सूक्ते गावी
मग इंद्रधनू रंगांची अवनीवर उधळण व्हावी
येथेच निर्मू दे स्वर्ग फळ तेच आम्हा श्रमण्याचे ।। २ ।।

विद्या नि अविद्या दोन्ही एकाच गुंफू धाग्यात
कर्मातून उमजे ज्ञान हे सूत्र असो मर्मात
तृषितांची मिटण्या आस शिंपूया उदक यत्नांचे ।। ३ ।।

## ७३. *नयी बहारें आई है* (हिंदी)

नयी बहारें आई है
नयी दिशा नया गगन
नयी उमंग लेके अब
विकास की नयी लगन ।। ध्रु. ।।

व्यक्ती व्यक्ती हर यहाँ
समर्थ हो, सुशील हो
अतुल धैर्यवान और
अमिट किर्तिमान हो ।। १ ।।

जो संकटों के परबतों से
निपटकर अचल रहे
जो स्वयं के स्वार्थ को भी
दुःखितों पे हार दे ।। २ ।।

प्रेम हो, मृदुत्व हो,
आर्त बंधुभाव हो,
हृदय में हरेक के
मातृभू की मूर्त हो ।। ३ ।।

शुचित्व का, प्रभुत्व का
यहां अपूर्व मेल हो
सबकी शक्ती एक हो तो
सार्थ राष्ट्रहस्त हो ।। ४ ।।

# ७४. आज त्यामुळे कृतार्थ जीवन

तुम्हीच गुरुवर मायेने मज सदैव म्हटले गुणी
आज त्यामुळे कृतार्थ जीवन अखंड तुमचे ऋणी ।।ध्रु.।।

खेळ खेळलो रमलो दमलो, गिरिवर केव्हा चढलो, पडलो
कठोर केले कष्ट प्रसंगी, कधी भांडलो, रुसलो, हसलो
या सर्वांचे साक्षी झाला तुम्ही सर्व सोसुनी ।।१।।

बालिश होत्या भावभावना, अनुभव अपुरा, भव्य कल्पना
मी असला अन् मी तसला हा, अहंपणाचा गंड देखणा
तरीही तुम्ही हसत कौतुके नेले सांभाळुनी ।।२।।

अल्प यशाचे कौतुक केले, वेडे साहस थोर मानले
सतत चुका त्या केल्या आम्ही, मूकपणे फळ तुम्ही भोगले
शिष्यांसाठी श्वास वेचला स्वत:सही विसरूनी ।।३।।

कोणी कुठला मूक उपेक्षित, त्याला फुलवी करूनी दीक्षित
वित्तसागरामधला मोती, कुणी योजला करण्या जनहित
योजक तुम्ही दुर्लभ ऐसे आजकालचे मुनी ।।४।।

पूर्ण अम्ही जगजेते आम्ही, हेच आमुच्या मनी ठसविले
अवघड, अर्धे, उणे आमुचे, अलगद यत्ने तुम्ही पुसले
मानवातली मूळ पूर्णता उलगडली शिक्षणी ।।५।।

स्नेहाचे ऋजु बंध जोडुनी, जे उत्तम ते नित्य वेचुनी
उद्यम ईर्ष्या वैराग्याचे, स्वत्त्वाचे गुण सतत पेरूनी
मायभूमिच्या सेवेचे व्रत बिंबविले मन्मनी ।।६।।

## ७५. गुरुवंदन

स्वीकारुनि ही नमने सुमने आशीर्वच द्यावा
नमोऽस्तु ते गुरुदेवा ।। ध्रु. ।।

आलो तेव्हा अनुभव होता मायपित्यांच्या वत्सलतेचा
परंतु तुमच्या परिसस्पर्शे ज्ञानचक्षु उघडला
परंपरेचा संस्कारांचा सहज लाभला ठेवा ।। १ ।।

सांगुन शिकवुन कधि उपदेशुन, विमल सुचरितातुनी दाखवुन
अज्ञानातुन अज्ञाताच्या जवळ घेउनी गेला
ऋषिकुल–प्रतिनिधी ! कृतज्ञतेचा प्रमाण हा घ्यावा ।। २ ।।

आजवरी अतिपरिचय होउन, तुम्हास प्रियमित्रासम मानुन
कधी अवज्ञा कधी अनादर अजाणतेपणि घडला
क्षमस्व गुरुवर ! क्षमा असावी मनात राग नसावा ।। ३ ।।

तुमचे हे व्रत पुढे चालवू निरलस श्रमुनी सुयश मेळवू
तुमच्या कर्मरतीतुन अमुच्या मनि आहे रुजला
‘कर्मातच ज्ञानाचे सार्थक’–हा तुमचा सांगावा ।। ४ ।।

तुमच्या इच्छा अमुची स्फूर्ती तुमची स्वप्ने अमुच्या ज्योती
बळ अमुच्या पंखांतुन वाहे ती तुमची माया
त्या मायेची ऊब लाभुनी तेज मिळे सद्भावा ।। ५ ।।

गुरुतेचे आकर्षण भेदुन नीलनभी लीलेने विहरुन
स्वर्गंगेतील कमळे खुडुनी नटवू भारतभूला
त्यासाठी आचार्य ! आम्हांला आशीर्वाद हवा ।। ६ ।।

# ७६. वरदविनायक हे संचालक

वरदविनायक, हे संचालक, युवजन नायक नमो
हे संचालक नमो ।। ध्रु. ।।

तुम्ही अम्हाला इथे शिकविले इतरांसाठी जिणे
घोर जरी अंधार भोवती तरुणांनी का भिणे?
उज्ज्वल माझा दिवस उद्याचा सर्वांसाठी असो
एक एक जोडीत जीवना जनसंघटना दिसो
स्वप्न असे हे तुम्हि दिधलेले प्रतिदिन आम्हा गमो ।। १ ।।

मत्सर आहे, मस्ती आहे, पुंडजनांची भीती
दारिद्र्याचा शाप सनातन, दांभिकता ही नीती
शब्द-वेष-देशांच्या भिंती, लढत शेकडो जाती
धमन्यांमधुनी रक्त एक परि पूर्ण लोपली नाती
अशा आपुल्या हतबल देशा सुधारण्या मन रमो ।। २ ।।

बुद्धिमंत हो पूर्ण समर्पित, विद्या हो व्रतदायी
लाचारीचा अंश नसावा समाजसेवेपायी
धर्म बनावा समाजधारक विद्वत्ता उपयोगी
निराधार खेड्यात सुखाची स्वप्ने व्हावी जागी
असे प्रबोधन हे आजीवन तुजसम आम्हा जमो ।। ३ ।।

## ७७. शतशरदांस्तव

शतशरदांस्तव स्वीकारा ही अमुची पुष्पशती ।। ध्रु. ।।

प्रबोधिनीच्या सूर्यकुलाचे तुम्ही प्रिय नेते
तुमच्या आकांक्षी स्वप्नांना गगन थिटे गमते
नवल असे की वास्तव चाले या स्वप्नांमागुती ।। १ ।।

धर्मचेतनेच्या गंगेचे अभिनव स्रोत तुम्ही
हिंदुत्वाच्या प्रबोधनाचे अग्रदूत तुम्ही
राष्ट्ररथाची तुम्ही कल्पिली नव दिशा नव गती ।। २ ।।

तुम्ही घुमविले गायत्रीचे संघगान येथे
पृथ्वीवर पाचारण केले अनंत तेजा ते
आणि तुम्ही स्मृतिकार होउनी रचिल्या नूतन स्मृति ।। ३ ।।

अदम्य उत्कट चैतन्याचे रूप विशेष तुम्ही
प्रसन्न प्रेरक स्नेहशक्तिचे अक्षय कोष तुम्ही
स्फुरणदायिनी होवो आता तुमची उक्ती कृती ।। ४ ।।

ह्या कार्याचे कंकण धरिले आम्ही तुमच्यासवे
अंगीकारले जीवनव्रत हे आम्ही दृढभावे
तुमच्या ठायी श्रद्धा अमुची निष्ठा तुमच्या प्रती ।। ५ ।।

# ७८. वंदन वंदन त्रिवार वंदन

हिंदुजातिची विजयपताका तुम्ही आणिली गंगोत्रीहुन
वेदवती या यात्रेमधले पथिक तुम्हाला करतो वंदन
वंदन ! वंदन ! त्रिवार वंदन !! ।।ध्रु. ।।

आक्रमकांनी धर्म बुडविला, होऊन दीप्ति मार्ग दाविला
देव मस्तकी धारण करिता, कर्तृत्वाचा वन्हि फुलला
महाराष्ट्र धर्माचा दिधला शिवरायांना मंत्र नवा
तुमच्या स्फूर्तीतून उमलले, आनंदाचे मंगल भुवन ।। १ ।।

निराश निद्रित विमनस्क मनी, विझल्या ज्योति पुन्हा पेटवुनि
स्वधर्म सांगुन, प्रकाश दावुन, भय नाशियले तांडव बनुनि
सरस्वतीचे तुम्ही उपासक, दयानंद हे तुमचे नाव
तुमच्या स्मरणे अमुच्या हृदयी, हिंदुत्वाचे स्फुरले गायन ।। २ ।।

भारतभूचा प्राण जाणुनि, भवितव्याचे दर्शन घडवुनि
अद्वैताचे अमृत अर्पुनि, ध्वज धर्माचा गगनी भिडवुनी
नरदेहाचे केले सार्थक, नरेन्द्र ! तुमचे आम्ही उपासक
कार्य अधुरे अनुसरताना, सुगंधित हो अमुचे जीवन ।। ३ ।।

अध्यात्मातिल क्रांतिकारक, क्रांतीचे अध्यात्म विलोचक
दिव्य जीवनी तुमच्या दिसला तेजाचा त्या नव अवतार
घोष जगी या अखंड चालो, तव नामाचा हो अरविंद
चित्शक्तीच्या अवतरणाला, घडो आमुचे जीवन साधन ।। ४ ।।

प्रबोधनाचे तुम्ही प्रवर्तक, हिंदुत्वाचे अहो उपासक
नवधर्माचे तुम्ही प्रचोदक, मानव्याचे जणु पथदर्शक
मार्ग आमुचा उजळो जगति, तेजोमय हे तुमचे जीवन
आता तुम्हा स्मरताना घडले, कर्तव्याचे समग्र दर्शन ।। ५ ।।

# ७९. उत्तिष्ठत जाग्रत !

त्या तेजस्वी डोळ्यांमधली वीज अजुन सांगते
उत्तिष्ठत जाग्रत ! बंधूंनो उत्तिष्ठत जाग्रत ! ।। ध्रु. ।।

ऐन यौवनी मदन दाहुनी जे प्रलयंकर झाले
वेदान्ताच्या गूढ गुंजनी जे नवशंकर झाले
हिंदुधर्म अन् हिंदुदर्शने जगात गाजविली
मानवमात्रा बंधुत्वाची साद जये घातली
असुन विरागी निःसंगाचे जे स्वामी होत ।। १ ।।

अखिल विलासांसह नत होती यक्षभूमि पश्चिमा
मनी परंतु मायभूमितिल आर्तांची वेदना
आणि भुकेल्या श्वानास्तवही मोक्षाची हेळणा
हेच डोळुले शिणले होउनि बुद्धाची करुणा
मठबद्धांना मानवतेची शिकवित नवगीते ।। २ ।।

त्या डोळ्यांनी अनागताचा थेट वेध घेउनी
भारतभूच्या भवितव्याचे स्वप्न भव्य पाहिले
आत्म्याचे संगीत ऐकवुनि जडवादी दुनियेला
भारत विश्वगुरू करण्याचे कार्य अजुनि राहिले
त्या कार्याचा वसा घेउ या, तोच ध्यास ध्येय ते ।। ३ ।।

## ८०. जाग हे शार्दूल जाग (हिंदी)

जाग हे शार्दूल जाग, जाग हे पुराणपुरुष
सदियों की निंद छोड, आत्मवंचना को त्याग,
जाग हे पुराणपरुष, जाग हे शार्दूल जाग।।ध्रु.।।

शृंखला में बद्ध हो, विद्ध हो परचक्र से
मूर्छना से बेखबर, और गलित गात्र से
वेदि में अंगार तेरे, छानलो ये राखराख।।१।।

धर्म तेरे प्राण है, अध्यात्मही अभिमान है
वेद तेरी शान और, वेदान्तही पहचान है
आत्मग्लानि से जगो, तब चलेंगे साथ भाग।।२।।

तू स्वयं नचिकेत है, हे सत्यव्रत, हे धैर्यधर
तम से तेज मार्गपर,चल मृत्यु से अम्रित की ओर
दीपस्तंभ तुमही हो, तुमही बुद्ध ग्यान, जान।।३।।

कैलाश से ओम्कार की, ध्वनित गुंज को सुनो
उदधियों की गाज में, विनित अर्चना सुनो।।
आसिंधु सिंधू भूमि ने तो, कबसे ली है ठान, आज।।४।।

कभी न थे विकलांग तुम, हिमाद्री से उत्तुंग तुम
क्लैब्य को तुम छोड दो, पुरुषार्थ से हो युक्त तुम
जरा से न डर जरा, उठो युवा-रक्त तुम
दासता के डोर तोड, सदियों से हो मुक्त तुम।।५।।

उत्तिष्ठत ! जाग्रत !! प्राप्य वरान्, निबोधत !!!
जयतु भारत, भाग्यशाली.. जय हो तेरी तेजरत !!!
जय हो तेरी तेजरत, जय हो तेरी तेजरत...!

# ८१. भारतमाता एकच दैवत

भारतामाता एकच दैवत येत्या दिवसांचे
इतर देव हे नाममात्र अन् केवळ नवसांचे
... असे हे शब्द नरेंद्राचे ।। ध्रु. ।।

युगयुग अपुल्या भरणपोषणा
असुरांपासुन नित्य रक्षणा
या मातेचे आशीर्वादच अपुल्या हक्काचे ।। १ ।।

खरे, स्वयंभू, जागृत, पावन
दैवत हे तर अपुले आपण
नाहि दुरावा, द्वैत न उरले देवाभक्तांचे ।। २ ।।

या देशातील हे नारीनर
सन्मानाने जगावेत जर
आपसातले विसरू भांडण अनंत शतकांचे ।। ३ ।।

कसले उत्सव, कसल्या यात्रा
दैन्य जोवरी, अन्न न पात्रा
वेदान्ताशी जोडू विक्रम, ध्येय भारताचे ।। ४ ।।

स्मरुनी केवळ ते गतवैभव
लोपत नाही दरिद्र वास्तव
यत्न हवे आनंद लाभण्या, बोल विवेकाचे ।। ५ ।।

# ८२. हाक तुझी परि मनी वसे

तंत्रज्ञानी नवे सहस्रक केवळ वैभव सांगतसे
अध्यात्मासह विज्ञानाची हाक तुझी परि मनी वसे।।ध्रु.।।

पार्थासम एकाग्र साधना, उग्र विरागाचीच अर्चना
संन्यस्तांच्या संघटनेला सेवेची दृढमूल प्रेरणा
शतशतकांचे द्रष्टे चिंतन तुझ्या अंतरी उमलतसे...।।१।।

सप्तसिंधुच्या पार घुमविली तू हिंदूंची विजयघोषणा
ज्ञानकर्मयोगातुन दिधली वीरत्वासह अपार करुणा
जे जे शोषित ते नारायण, पूज्य मानले देव जसे...।।२।।

आज पश्चिमा वित्तबळाने पदोपदी दुनिया झुकवी
स्वत्वाला विसरला देश हा गुलामीच त्याला सुखवी
वज्राघाती वेदान्ताची शास्त्रसंपदा हवी असे...।।३।।

राष्ट्र दीनवाणे झालेले, धर्मतेज नाही उरले
वनराजाचे गोत्र विसरता, करुण केसरी भेदरले
या भ्रांतीतुन जागे होण्या शब्द तुझे आसूड जसे...।।४।।

## ८३. हे वीर विवेकानंद

हे वीर विवेकानंद हिंदुयशमूर्ती
हे युवकप्रवर तू युवहृदयांची स्फूर्ती ।। ध्रु. ।।

दास्यात पाहुनी विश्वधर्मजननी ही
तू क्षुब्ध सिंहसा व्याकुळ अंतर्यामी
मुक्तीचा तिचिया ध्यास तुला दिनराती ।। १ ।।

शत आघातांनी कुंठित मूर्च्छित झाली
ती हिंदुचेतना फिरून तू चेतविली
तिज उन्नत मस्तक निर्भय केले जगती ।। २ ।।

स्मरतात तुझे ते घनगर्जितसे शब्द
'मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद'
जग जिंकायाची ईर्ष्या दाटो चित्ती ।। ३ ।।

तव अमृतवाणी हाक देत आम्हाते
रे अतुल बलस्वी करू हिंदुराष्ट्राते
युवशक्ति हवी मज कार्यशरण पुरुषार्थी ।। ४ ।।

जी जीवनपुष्पे सतेज नव रक्ताची
स्थापावा त्यांनी धर्म आत्म अर्पूनी
त्यानेच अर्चना होत राष्ट्रदेवाची ।। ५ ।।

## ८४. हे वीर विवेकानंद... (हिंदी)

हे वीर विवेकानंद हिन्दुयशमूर्ति... हिन्दुयशमूर्ति...
हे युवकप्रवर, तुम युवहृदयों की स्फूर्ती।। ध्रु. ।।

माँ विश्वधर्म की देखी जब बन्धन में
तुम क्षुब्ध सिंह से व्याकुल थे अंतर में
उसके मुक्ती की प्रखर आस मन में थी।। १ ।।

शत आघातों से मर्माहत थी कब की
वह हिन्दुचेतना तुमने संजीवित की
अर्पण की उसको निर्भयता-यश-किर्ती।। २ ।।

स्मरते ह तेरे घनगर्जित से शब्द
मन वज्र बनें, तन बन जायें फौलाद
दस दिशा जीतने सिद्ध बने वीरव्रती।। ३ ।।

है पुकारती तव अमृतवाणी हमको
रे, अतुलबलस्वी करो मातृभूमी को
युवशक्ति चाहिये कार्यशरण, पुरुषार्थी।। ४ ।।

जो सतेज सुन्दर जीवनपुष्प खिलता है
उससे ही पूजा स्वदेश की करनी है
अब धर्मजागरण बने ध्येय की ज्योती।। ५ ।।

('हे वीर विवेकानंद' या गीताचा हिंदी अनुवाद)

## ८५. हे ऋषिवर श्रीअरविंद

हे ऋषिवर श्रीअरविंद, हे चिन्मय मधुरा-माते
युवशक्ति हिंदुराष्ट्राची, वंदिते आज तुम्हाते ।। ध्रु. ।।

वेड एक होते तुम्हा, मातृभूमिच्या मुक्तीचे
उग्र खड्ग झाला तुम्ही, जागृत भारतशक्तीचे
'व्हा सिद्ध संगरा', वदला, 'सांडूनि भ्रांति-मोहाते' ।। १ ।।

द्रष्ट्या प्रतिभेने तुमच्या, स्वप्ने आम्हासी दिधली
'ही अखंड होइल भूमी, जरि खंडित आता दिसली,
संजीवन अध्यात्माचे, देईल तृषित विश्वाते' ।। २ ।।

'हा हिंदुधर्म-हे राष्ट्र, अद्वैत असे उभयांचे
राष्ट्रार्थ तनुमने झटणे हे धर्माचरणचि साचे'
या धर्मसाधनेलागी, पथदर्शी तुमची चरिते ।। ३ ।।

तनुतीर्थे शुचितम तुमची, की मूर्त अभीप्सा झाली
अतिमानस उतरुन आले, त्या पुण्यबलाने खाली
जड हलले-हसले-धाले ! लाहुनिया चैतन्याते ।। ४ ।।

जगदंतरि आहा तुम्ही, चैतन्यस्वरूपी नटुनी
हृदयांतरि यावे अमुच्या, प्रेरणामंत्र होवोनी
अम्हि पथिक देवसंघाचे, द्या आशीर्वच आम्हाते ।। ५ ।।

## ८६. निवेदितांचे स्वप्न जयस्वी...

चैतन्याचे नवे धुमारे
लक्ष-लक्ष हृदयी निर्मू
निवेदितांचे स्वप्न जयस्वी वास्तव होण्या अथक श्रमू ।।ध्रु.।।

स्वदेशभाषा, स्वदेशभूषा
आग्रह स्वदेशवृत्तीचा
प्रखर अस्मिता हिंदुभूमीची
गौरव निज आदर्शांचा
कला-शास्त्र अन् साहित्यातून सखोल दृष्टी प्राप्त करू ।।१।।

'परिस्थतीला शरण जाऊनी
कोण कधी विजयी झाले?
एकरूप-एकात्म भारती
हेच एक दैवत अपुले'
निवेदितांचे शब्दतेज हे जन जागविण्या नित्य स्मरू ।।२।।

दुर्बलतेला दूर सारूनी
अन्यायाशी झुंज हवी
चिंतन-शिक्षण-प्रबोधनातून
वाट सापडे नित्य नवी
कितीही असूदे प्रवाह बळकट उलट पोहूनी पार करू ।।३।।

निवेदितांची अर्पण वृत्ती
अमोघ वाणी-अपार भक्ती
गुरू शिष्येचे नाते उत्कट
अखंड प्रेरक स्त्री शक्ती
अंत:करणी रुजवून सारे संघवृत्तीने मार्ग क्रमू ।।४।।

## ८७. हे निवेदिते माते

हे निवेदिते माते मूर्त तू रूप ज्ञानदेचे
गुरुचरणी जे समर्पिले ते जीवन तव समिधेचे ।। ध्रु. ।।

धवलधारिणी तू तपस्विनी
चेतनामयी तू सौदामिनी
हाती स्मरण देतसे अंगीकृत कार्याचे ।। १ ।।

विजयध्वजा तू वैराग्याची
धुरंधरा तू जनशक्तीची
तव प्रतिभेचा परिस लाभता सोने सकल कलांचे ।। २ ।।

स्थिर चित्ता तू कर्मयोगिनी
नित्य व्रतस्था तू तेजस्विनी
तुझ्या तीर्थी अवतरले शुभ पश्चिम अन् पूर्वेचे ।। ३ ।।

भारत ज्योतींची तू दीप्ती
कालीची तू अभया मूर्ती
चंदन ज्वाले फुले तुझ्यातुन प्रलयंकर क्रांतीचे ।। ४ ।।

## ८८. हे कर्मयोगिन्

हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या असंख्यात ज्योतिर्दळे लावली
जरी दाट अंधार आहे सभोती तरी आमुची वाट तेजाळली।।ध्रु.।।

दिली ध्येयनिष्ठा दिली कार्यनिष्ठा, मनी रेखलेली श्रमाची प्रतिष्ठा
समाजार्थ नि:स्वार्थ सेवा कराया तुम्ही त्यागदीक्षा आम्हाला दिली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या कृतीने नवी प्रेरणा कोरली।।१।।

जेथे घोर अन्याय थैमान घाली तिथे धावुनी जा तुम्ही निर्भय
पटे सत्य तेथे तुम्ही ठाण मांडा युवाशक्ति आहे जगी दुर्जय
उद्याच्या जगाचे नवे स्वप्न देखा, दिसू दे तुम्हाला उष:कालरेखा
अरे आज जे गांजले-पोळलेले मिळू दे सुखाची तयां सावली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या अशी ध्येयसृष्टीच साकारली।।२।।

तपस्वी मनस्वी जरी आकृती ती नसे आज साक्षात् समोरी उभी
स्मृतींच्या कृतींच्या हजारो शलाका तरी चेतलेल्या मनाच्या नभी
वसा टाकुनी दूर जाणार नाही, रणातून माघार घेणार नाही
अम्हि अंतरात्म्यास साक्षी करोनी मनाने प्रतिज्ञा अशी घेतली
हे कर्मयोगिन्, तुम्ही मानसी या नवी वज्रबीजेच ही पेरली।।३।।

## ८९. ध्येयप्रवण साधक (संस्कृत)

ध्येयप्रवण साधक, कार्यपथे साधय
मृदु हसन्, मधु किरन्, मातरं सदा स्मरन् ।।ध्रु.।।

जीवनं न शाश्वतं, वैभवं न हि स्थिरम्
स्वार्थलेपनं विना, सत्कृतं हि तत् चिरम्
सरलता स्वजीवने (तान)
चिंतने उदात्तता (तान)
समाजपोषिताः वयं, कृतज्ञभाव रक्षयन् ।।१।।

या च मनसि भावय, या च शिरसि धारय
मातृभूमि सा सदा, हृदन्तरे सुपूजय
प्रेमरूपिणी पदे (तान)
जीवितं समर्पितम् (तान)
प्रसन्नवृत्ति - निर्भयाः वयं भवेम संगताः ।।२।।

पूर्वजकृतं स्मर, सुतेज धैर्य संगरम्
वीरव्रत स्वीकुरू, सिंहकुल विभूषण !
सन्तु कष्टकोटयो : (तान)
भवतु विघ्नवर्षणम् (तान)
अजरो भव, अमरो भव, अपराजित सर्वदा ।।३।।

## ९०. उपासनेची जोड हवी

इतिहासाची उलटुन पाने
भविष्यवेधी कृती हवी
अभ्युदयाला परमार्थाच्या
उपासनेची जोड हवी ।। ध्रु. ।।

हिंदुत्वाचे पुनर्जागरण
विरक्तीतही करुणासिंचन
जेत्यांच्या उन्मत्त शिरावर
धर्मध्वजेचे हो आरोहण
अद्वैताच्या त्या पथिकासम
जागृत अर्पण वृत्ति हवी ।।१।।

निःशस्त्रांची उभवुन सेना
सत्यव्रताचे मार्ग निर्मिले
अंत्यजपूजा सार्थक मानुन
राष्ट्रशक्तिचे मर्म जाणले
त्या द्रष्ट्याचे शब्द उमगण्या
अंतःकरणा साद हवी ।।२।।

ध्येय एक, जरि भिन्न साधने
कोटि मनांचे बळ जागविणे
समर्थ वाणी – सहज कृतीतुन
'राष्ट्रधर्म' अवघा उलगडणे
त्या धर्माचे स्वत्व राखण्या
तेज-सत्त्व, अन् भक्ति हवी ।।३।।

## ११. ईश्वरचरणी समर्पिता...

पृथ्वी, जल, वायू, तेजाने, आकाशाने भरलेली
शुद्ध घडो काया माझी जी महाभुतांनी व्यापियली
कोण असे मी? मी काया की तिच्यामध्ये स्थित चेतनता?
ज्योति असे मी विमल निरागस, ईश्वरचरणी समर्पिता।। ध्रु. ।।

प्राण, अपाने, व्यान, उदाने, समानादि पंचप्राणे
व्याप्त तनू ही, चेतन राहो, प्राणांविण कुठले जगणे?
कोण असे मी? पंचप्राण की? की त्यांच्यावरली सत्ता? ।। १ ।।

शब्द कर्णिचा, स्पर्श त्वचेचा, रूप विषय हा नयनांचा
रस जिव्हेचा पावन होवो, गंध नासिकाद्वारींचा
कोण असे मी? संवेदन का? की या विषयांचा भोक्ता? ।। २ ।।

विचार करणे कर्म मनाचे, वाणीचे बोलणे असे
अन् देहाचे कृती असे, मी कर्मशुद्धि ती प्रार्थितसे
कोण असे मी? ही कर्मे का? की या कर्मांचा कर्ता? ।। ३ ।।

अन्न, प्राण अन् मन-विज्ञाने, आनंदाने नटलेले
शुद्ध असावे पंचकोश हे, निर्मळात जे वसलेले
कोण असे मी? पंचकोश का? की त्यांचाही निर्माता? ।। ४ ।।

या कायेच्या कणाकणामधि, दिव्य प्रेरणा नित्य वसे
कणात तनुकण, परमकणातहि प्रभा ज्योतिची प्रकटतसे
कोण असे मी? आता कळले, मी तर परमात्मा-सविता
ज्योति असे मी विमल निरागस, ईश्वरचरणी समर्पिता ।। ५ ।।

## ९२. नमस्कार देवा...

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ।। ध्रु. ।।

हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी
अशा सर्व स्वप्नास सामर्थ्य यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ।। १ ।।

जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
अम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी
तयांच्या कळा जाणवाव्या अम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ।। २ ।।

स्फुरो कल्पनाशक्ती अभ्यास यत्ने
बनो शुद्ध बुद्धी हि तेजस्विनी
शरीरास आरोग्य संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी
पदी धैर्य बाहूत शौर्य स्फुरावे
घडावी विवेकी कृती ध्यास हा ।। ३ ।।

प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणुरेणु ब्रह्मांड तू व्यापिले
तुझे अंश आम्ही तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले
पुन्हा जन्म घेऊ स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ।। ४ ।।

# ९३. प्रार्थना

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची
ही हिंदुभू परमश्रेष्ठपदास न्याया
आम्ही कृती नित करू झिजवोनि काया ।। ध्रु. ।।

विज्ञान-ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो
अभ्यास देशस्थितिचा समतोल चालो
निष्ठा विवेक प्रकटो मन पूर्ण शुद्ध
वर्तू अम्ही दृढप्रसन्न नि ध्येयधुंद ।। १ ।।

होती अनेक हृदये जरि एकरूप
सामर्थ्य तेथ प्रकटेल तरी अमूप
हा मंत्र संघरचनार्थ सदा जपू या
हे ज्ञान-कर्म-युत भक्ति-व्रत आचरू या ।। २ ।।

की पुण्य-श्रेय-यश-कीर्ति सदैव लाभो
निंदा-प्रहार अथवा नच कोणि लोभो
आशा हसो विमल वा भिववो निराशा
सोडू कधी न पथ हा चिर ठेवु आशा ।। ३ ।।

दाही दिशांत घुमुनी जयनाद जेव्हा
होई अखंड प्रियभूमि अजिंक्य तेव्हा
हृन्मंदिरातिल निवेल तृषा कधीची
हे देव आस पुरवी तव पूजकांची ।। ४ ।।

की घेतले व्रत न हे अम्हि अंधतेने
लब्ध-प्रकाश-इतिहास-निसर्गमाने
जे दिव्यदाहक म्हणोनि असावयाचे
बुद्ध्याचि वाण धरिले करि हे सतीचे ।। ५ ।।

## ९४. *शुभचिन्तन प्रार्थना* (संस्कृत)

शुभचिन्तनमस्तु अद्य जन्मदिने ते।
नन्दाम: गायाम: जन्मदिने ते।।ध्रु.।।

दिने दिने वर्धस्व प्राप्नुहि यश:
तव मार्गे अस्तु सदा धवलप्रकाश:
अभिनन्दनमस्तु अद्य जन्मदिने ते।।१।।

आयुष्मन् शतं जीव चिरंजीव रे
लोकमित्रमिति कीर्तिस्तव सदाऽस्तु रे
निरामयं निर्व्याजं हसितमस्तु ते।।२।।

सर्वेषाम् अद्याशी: सुखं प्राप्नुहि
सद्‌गुणसम्पद् लसतु सर्वदा त्वयि
आशीर्युत हस्तो मे अस्तु मस्तके ।।३।।

## ९५. *सुदिनं सुदिनम्* (संस्कृत)

सुदिनं सुदिनं जन्मदिनं तव।
भवतु मंगलं जन्मदिनम् ।।

विजयी भव सर्वत्र सर्वदा ।
विजयी भव सर्वत्र सर्वदा ।
जगति भवतु तव सुयशो गानम् ।।

सुदिनं सुदिनं जन्मदिनं तव ।
भवतु मंगलं जन्मदिनम् ।।

# ९६. हे विश्वात्मक

हे विश्वात्मक तव भक्ताचा स्वीकारी प्रणिपात
प्रार्थना हीच आज हृदयात।।ध्रु.।।

अन्तरात जी वसे हीनता
मोह असूया आणि अहन्ता
दृढ वज्राने त्यांच्यावरती करि निर्मम आघात।।१।।

सुखात किंवा विपदाकाली
अविचल राहो शान्ति आतली
प्रसन्नतेचे दैवी स्मित रे नित विलसो ओठात।।२।।

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी ने ज्योतिर्जगतात।।३।।

सेवेतच सार्थक गवसावे
जीवशिवाचे मैत्र जुळावे
विश्वच अवघे सिंचित व्हावे स्नेहामृत सेकात।।४।।

आर्तांना हृदयासि धरावे
श्रान्तांसाठी छाया व्हावे
मात्र खलांच्या सत्तेपुढती जुळोत ना कधि हात।।५।।

तू दिधलेले हे तेजोबल
सहज तुझ्या चरणांशी वाहिल
अशी लीनता उमलो आता माझ्या मनमर्मात।।६।।

(रवींद्रनाथ ठाकूर यांच्या **'This is my prayer to Thee My Lord'** या कवितेचा भावानुवाद)

## १७. हो रही हैं आरती... (हिंदी)

मातृमंदिर में चलो प्रिय हो रही है आरती ।। ध्रु. ।।

शंखध्वनि उठने लगी है दीप की लौ भी जगी है
आज करुणा लिये वीणा स्वयं ही झंकारती ।। १ ।।

मूर्ति माँ की शांत है वरदायिनी स्मितशालिनी
अन्नपूर्णा और लक्ष्मी ज्ञानदा यह भारती ।। २ ।।

मूर्ति में उसके परे भी निखिल-जीवन-व्यापिनी
देशजननी रूप में ही विश्वजननी दिखती ।। ३ ।।

मंदिरांगण भक्त आये धर्मरक्षक वीर आये
प्राणधुन गंभीर उनकी गर्भगृह में गूँजती ।। ४ ।।

तत्त्वदर्शी है ऋषिवर राष्ट्रद्रष्टा संत भी है,
भक्तजन के जलधि की लहरें हमें ललकारती ।। ५ ।।

## १८. ध्येयाचा सुगंध

ध्येयाचा सुगंध लाभला जीवना
आता समर्पणा पूर्ण व्हावी ।। ध्रु. ।।

क्रोध अहंकार जावो निरसून
विशुद्ध कांचन उजळावे ।। १ ।।

ईर्ष्या-असूयेला नाही येथ स्थान
निर्मळ चैतन्य खळाळत ।। २ ।।

प्रबोधिनीपद्म हिंदुराष्ट्रापायी
त्याचा अंश मीही धन्य झालो ।। ३ ।।

## ९९. प्रबोधिनी प्रबोधिनी

प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
एक ध्यास, एक आस आमुच्या मनोमनी ।।१।।

प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
एक तंत्र, एक मंत्र आमुच्या तनूमनी ।।२ ।।

प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी, प्रबोधिनी
साध्य एक, मार्ग एक आमुची प्रबोधिनी ।।३ ।।

## १00. हिंदुराष्ट्रदेवते...

हिंदुराष्ट्रदेवते, हिंदुराष्ट्रदेवते ।
शुद्ध भाव स्वीकारी-हिंदुराष्ट्रदेवते
चारु भक्ति स्वीकारी-हिंदुराष्ट्रदेवते
श्रद्धेचा दीप अचल तेवत पदि माते ।।
हिंदुराष्ट्रदेवते।।

बंधु भगिनि वंदितो-हिंदुराष्ट्रदेवते
शुभ कृती समर्पितो-हिंदुराष्ट्रदेवते
तव यश तव गौरव गे ही अमुची ईप्सिते ।।
हिंदुराष्ट्रदेवते।।

# दैनंदिन उपासना

**हरिः ॐ** (दोन्ही मिळून ५ सेकंद, विश्रांती २।। सेकंद)

**ॐ** (६ सेकंद, विश्रांती २।। सेकंद)

**ॐ** (९ सेकंद, विश्रांती २।। सेकंद)

**परब्रह्मशक्ती स्फुरो हिंदुत्वामध्ये .... ।। (पाच वेळा)**

(एकत्र म्हटल्यास सामान्यपणे ९४ सेकंद)

**परब्रह्मशक्ती स्फुरो प्रबोधिनीमध्ये .... ।। (पाच वेळा)**

(सुमारे ९४ सेकंद)

**ॐ पृथिवी–अप–तेजो–वायु–आकाशा मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तैत्तिरीय आरण्यक प्रपाठक १०, अनुवाक् ५६ । (सुमारे ४२ सेकंद)

(माझ्यातील पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही तत्त्वे शुद्ध होवोत, मी ज्योती आहे, मी आसक्तिरहित, पापरहित, व्हावे, स्वाहा.)

**ॐ प्राण–अपान–व्यान–उदान–समाना मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.प्र.१०, अनु.५१ । (सुमारे ४८ सेकंद)

(माझ्यातील प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान शुद्ध होवोत, मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे, स्वाहा.)

**ॐ शब्द–स्पर्श–रूप–रस–गन्धा मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.प्र.१०,अनु.५५ । (सुमारे ४८ सेकंद)

(माझ्यातील नाक, कान, डोळे, जि ा आणि त्वचा ही ज्ञानेंद्रिये शुद्ध होवोत. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित,पापरहित व्हावे, स्वाहा.)

**ॐ मनो–वाक्–काय–कर्माणि मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.परिशिष्ट अनु.६६ । (सुमारे ४१ सेकंद)

(माझे मन, वाचा, शरीर आणि कर्मे शुद्ध होवोत. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे, स्वाहा.)

**ॐ अन्नमय–प्राणमय–मनोमय–विज्ञानमय–आनंदमया मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.प्र.१०,अनु.५७ । (सुमारे ५४ सेकंद)

(माझ्यातील अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय हे कोष शुद्ध होवोत. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे,स्वाहा.)

**ॐ आत्मा मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.परि.अनु.६६ । (सुमारे २९ सेकंद)

(माझ्यातील आत्मा शुद्ध होवो. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे, स्वाहा.)

**ॐ अन्तरात्मा मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.परि.अनु.६६ । (सुमारे २९ सेकंद)

(माझ्यातील अन्तरात्मा शुद्ध होवो. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे, स्वाहा.)

**ॐ परमात्मा मे शुध्यन्ताम् ।**
**ज्योतिरहं विरजा विपाप्मा भूयासं स्वाहा ।।**

। तै.आ.परि.अनु.६६ । (सुमारे २९ सेकंद)

(माझ्यातील परमात्मा शुद्ध होवो. मी ज्योती आहे. मी आसक्तिरहित, पापरहित व्हावे, स्वाहा.)

**(२ मिनिटे चिंतन)**

**ॐ ॐ ॐ**

| | |
|---|---|
| **ॐ भूः ।** | हे पृथ्वी |
| **ॐ भुवः ।** | हे अंतरिक्ष |
| **ॐ स्वः ।** | हे सूर्य |
| **ॐ महः ।** | हे कोटिसूर्य |
| **ॐ जनः ।** | हे आकाशगंगा |
| **ॐ तपः ।** | अनंत आकाशगंगा |
| **ॐ सत्यम् ।** | हे परब्रह्म |

**ॐ तत्सवितुर्वरेण्यम् भर्गो देवस्य धीमहि ।**
**धियो (धियः) यो नः प्रचोदयात् ।।**

या परब्रह्माच्या देवाच्या श्रेष्ठ तेजाचे ध्यान करितो
अमुच्या बुद्धीला तो प्रचोदना देवो.

(तैत्तिरीय आरण्यक प्रपा.१०, अनु.२७)

# *मातृभूमि–पूजन उपासना*

**अध्वर्यू :** आजच्या या शुभदिवशी ..... .च्या निमित्ताने मातृभूमि–पूजन करण्यासाठी आपण एकत्र जमलो आहोत. आपल्या मातृभूमीच्या म्हणजेच भारताच्या विकासासाठी व एकात्मतेसाठी स्वामी विवेकानंदांनी दोन उपाय सांगितले आहेत – 'यापुढील काळात मातृभूमी हेच आपण सर्वांनी दैवत मानावे' आणि 'भारतातील सर्व धार्मिक संप्रदायातील शक्तींचे एकत्रीकरण करावे' या दोन्ही गोष्टींचे स्मरण करून मातृभूमिपूजनास प्रारंभ करूया. ॐ हे भारतीय भूमीत निर्माण झालेल्या सर्व धार्मिक संप्रदायांच्या एकीभूत शक्तींचे प्रतीक आहे. आपण आज 'मध्यभागी ॐ कार असलेल्या व अखंड भारताची प्रतिमा दर्शविणाऱ्या चित्रमूर्तीची' पूजा करीत आहोत. कार्यक्रमाची सुरुवात ॐ च्या उच्चारणाने करू या.

(एका पाठोपाठ एक तीन वेळा अध्वर्यूंनी ओंकार सांगावा व सर्व उपस्थितांनी तो म्हणावा.)

**अध्वर्यू व उपासक : हरि: ॐ, ॐ, ॐ**

**अध्वर्यू :** स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे – ''प्रथम एक मंदिर बांधूया. ॐ हे सर्व पंथीयांना वंद्य असे प्रतीक आहे. म्हणून केवळ त्या ॐ ची प्रतिष्ठापना या मंदिरात करू. तुम्हाला आपापल्या देवदेवतांची अन्यत्र पूजा करण्याचं स्वातंत्र्य आहेच. पण त्यामुळे ज्यांच्याशी तुमचे धार्मिक मतभेद आहेत त्यांच्याशी भांडण करण्याची आवश्यकता नाही. कारण सर्व मतांना व सर्व पंथांना एकच असणारी जी विशाल भूमिका, तिचे प्रतीक म्हणजे ॐ''(विवेकानंद, समग्र ग्रंथ, इंग्रजी खंड ३)

ॐ हे परब्रह्मशक्तीचे प्रतीक आहे. सर्व गुण आणि सर्व आकार ज्यापासून निर्माण होतात ती शक्ती म्हणजेच परब्रह्मशक्ती. सत्य, चैतन्य आणि आनंद हे त्या शक्तीचे सर्व गुणांना सामावून घेणारे गुण आहेत. म्हणूनच परब्रह्मशक्ती सच्चिदानंदयुक्त आहे असे म्हणतात. सर्व वैदिक मंत्रांचा व ग्रंथांचा आरंभ ॐ लिहून केला जातो. यजुर्वेदात म्हटले आहे –

**अध्वर्यू व उपासक : ॐ खं ब्रह्म ।** (यजु.अ–४०)

**अध्वर्यू :** ॐ हेच सर्वव्यापक (खं) ब्रह्माचे नाव आहे.
तैत्तिरीय आरण्यकात हेच सांगितले आहे

**अध्वर्यू व उपासक : ॐ इति ब्रह्म।** (तै. आ. अनु. ८)

**अध्वर्यू :** ॐ म्हणजेच ब्रह्म. कठोपनिषदातही म्हटलेले आहे –

**अध्वर्यू व उपासक :**

**सर्वे वेदा यत् पदमामनन्ति**
**तपांसि सर्वाणि च यद् वदन्ति ।**
**यदिच्छन्तो ब्रह्मचर्यं चरन्ति ।**
**तत्ते पदं सङ्ग्रहेण ब्रवीमि ।।**
**ॐ इति एतत् ।** (कठोपनिषद् १/२/१५)

**अध्वर्यू :** संक्षेपाने सांगायचे तर, सर्व वेद ज्या पदाचे सतत मनन करतात, सर्व प्रकारचे तप ज्यासाठी आचरले जाते आणि ज्याची इच्छा धरून ब्रह्मचर्याचे आचरण केले जाते, ते पद म्हणजे ॐ.

परब्रह्मचिंतन म्हणजे ॐ चे चिंतन, परब्रह्मपूजा म्हणजे ॐ ची पूजा. परब्रह्म हे निर्गुण, निराकार. त्याचे ॐ हे काहीसे साकार प्रतीक. पण हे प्रतीकसुद्धा आपणा सर्वांना समजत नाही. एकाग्रतेने पूजन करता येईल आणि सर्वांना समजेल असे काहीतरी सगुण साकार प्रतीक हवे. त्यामुळे गणपती या मूर्त आकाराची कल्पना निघाली.

**अध्वर्यू :** म्हणूनच आपण गणेशाच्या रूपातील ॐकाराला परब्रह्माचे प्रतीक समजतो. दरवर्षी त्याची प्राणप्रतिष्ठापूर्वक पूजा करतो. अर्थात, गणपती हे परब्रह्मशक्तीच्या अनेक प्रतीकांपैकी एक आहे. परब्रह्मशक्ती वस्तुत: एकच आहे. गणपतीशिवाय इतरही देव-देवता, प्रतीके आणि महापुरुष यांच्या पूजनाने आपण याच एका आदिशक्तीची आराधना करीत असतो. श्री गणपतिअथर्वशीर्षात म्हटलेच आहे.

**अध्वर्यू व उपासक : त्वं ब्रह्मा त्वं विष्णुः त्वं रुद्रः त्वमिन्द्रः त्वमग्निः त्वं वायुः त्वं सूर्यः त्वं चन्द्रमाः त्वं ब्रह्मभूर्भुवः स्वरोम्।।**

**अध्वर्यू :** तू ब्रह्मदेव, तूच विष्णू, तूच रुद्र, तूच इंद्र, तूच अग्नी, तूच वायू, तूच सूर्य, तूच चंद्र, तूच ब्रह्म, तूच भूः, तूच भुवः, तूच स्वः व तूच ॐ कार आहेस. अथर्वशीर्षात सर्व जुन्या संपद्रायांच्या दैवतांचा समन्वय केला आहे.

भारतीय भूमीत निर्माण झालेले सर्व संप्रदाय किंवा उपासनापंथ किंवा धर्ममते यांनीही ॐ लाच परब्रह्माचे ध्वनिरूप प्रतीक मानले आहे.

**अध्वर्यू :** शैवमताचे लोक म्हणतात

**अध्वर्यू व उपासक : ॐ नमः शिवाय ।**

**अध्वर्यू :** वैष्णवमताचे लोक म्हणतात

**अध्वर्यू व उपासक : ॐ विष्णवे नमः ।**

**अध्वर्यू :** जैनमताचे लोक म्हणतात

**अध्वर्यू व उपासक : ॐ नमो अरिहंताणं ।**

**अध्वर्यू :** बौद्धमताचे लोक म्हणतात

**अध्वर्यू व उपासक : ॐ मणिपद्मे हुम् ।**

**अध्वर्यू :** शीखमताचे लोक म्हणतात

**अध्वर्यू व उपासक : इक ओंकार सत्नाम कर्ता पुरख ।**

**अध्वर्यू :** आधुनिक काळात भारतात नांदत असलेल्या सर्व देशी-विदेशी धार्मिक संप्रदायांचा समन्वय करून श्रीविनोबांनीही आपल्या नाममालेत हेच सांगितले आहे

**अध्वर्यू व उपासक :**

**ॐ तत्सत् श्रीनारायण तू पुरुषोत्तम गुरु तू**
**सिद्ध बुद्ध तू स्कंदविनायक सविता पावक तू ।**
**ब्रह्म मज्द तू यहव शक्ति तू येशु पिता प्रभु तू**
**रुद्र विष्णु तू रामकृष्ण तू रहीम ताओ तू ।**
**वासुदेव गो विश्वरूप तू चिदानंद हरि तू**
**अद्वितीय तू अकाल निर्भय आत्मलिंग शिव तू ।।**

**अध्वर्यू :** स्वामी विवेकानंदांनी म्हटले आहे - ''येत्या काळात आपलं एकमेव दैवत म्हणजेच आपलं राष्ट्र . त्याचीच आराधना करा. ते जागृत आहे. सर्वत्र त्याचेच चरण, त्याचेच हात, त्याचेच कान ! ते सर्वव्यापी आहे. मनुष्यमात्र, प्राणिमात्र आणि आपले सर्व देशबांधव ही आपली दैवतं आहेत. प्रथम त्यांची पूजा करा !'' (विवेकानंद, समग्र ग्रंथ, इंग्रजी खंड ३)

म्हणूनच या नाममालेत पुढील भर घालून म्हणूया.

**अध्वर्यू व पाठोपाठ उपासक :**

**आर्तरूप तू रुग्णरूप तू जनी जनार्दन तू ।**
**अज्ञरूप तू दीनरूप तू राष्ट्ररूप ही तू ।।**

**अध्वर्यू :** आपापले व्यक्तिगत आराध्य दैवत, इष्ट प्रतीक, आदर्श साध्वी किंवा सत्पुरुष (म्हणजेच परब्रह्मशक्तीचे आपल्याला प्रिय रूप) हे ॐ मध्येच सामावलेले आहे, याची आठवण आपण केली. एवढेच नाही तर भारताबाहेर निर्माण झालेल्या संप्रदायांनी मानलेले परमोच्च दैवत हे सुद्धा त्याच एका ईश्वरी शक्तीचे रूप आहे याचेही आपण स्मरण केले. सर्व सगुण–साकार किंवा निर्गुण–निराकार आदर्शांमध्ये एकच ईश्वरी तत्त्व पाहण्याची प्रतिभा भारतात प्रकट झाली आणि भारतानेच ही दृष्टी आजवर टिकवली आहे. ईश्वरविषयक मतभेदांमुळे आपापसात कलह न करण्याची ही दृष्टी साऱ्या जगाला देण्याचे काम भारतच करू शकेल. यासाठी ॐ च्या रूपातील ईश्वरी तत्त्वाची पूजा करण्याबरोबर ही जीवनदृष्टी जिथे विकसित झाली त्या मातृभूमीचे पूजन आपण एक गीत म्हणून करूया.

**पद्य : बलसागर भारत होवो**

**बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो ।। ध्रु. ।।**
**हे कंकण करि बांधियले, जनसेवे जीवन दिधले**
**राष्ट्रार्थ प्राण हे उरले, मी सिद्ध मरायाला हो...।। १ ।।**
**वैभवी देश चढवीन, सर्वस्व त्यास अर्पीन**
**तिमिर घोर संहारीन, या बंधु सहाय्याला हो...।। २ ।।**
**हातात हात घालून, हृदयास हृदय जोडून**
**ऐक्याचा मंत्र जपून, या कार्य करायाला हो... ।। ३ ।।**
**करि दिव्य पताका घेऊ, प्रिय भारत गीते गाऊ**
**विश्वात पराक्रम दावू, ही माय निजपदाला हो... ।। ४ ।।**
**या उठा, करू हो शर्थ, संपादु दिव्य पुरुषार्थ**
**हे जीवन ना तरी व्यर्थ, भाग्यसूर्य तळपत राहो... ।। ५ ।।**
**ही माय थोर होईल, वैभवे दिव्य शोभेल**
**जगतास शांति देईल, तो सोन्याचा दिन येवो... ।। ६ ।।**

**अध्वर्यू :** या गीतानंतर आता काही सामूहिक व व्यक्तिगत संकल्प करूया. पूजा करताना गंध, फूल, धूप, दीप व नैवेद्य असे पाच उपचार अर्पण करतात. आपण त्या ऐवजी पाच सामूहिक व पाच वैयक्तिक संकल्प अर्पण करणार आहोत. मी एक-एक संकल्प सांगेन व पाठोपाठ आपण सर्वांनी म्हणावे. प्रत्येक संकल्पानंतर 'ॐ समर्पयामः' म्हणताना आपल्या सर्वांतर्फे एकेकाने प्रतिनिधी म्हणून मातृभूमीला पुष्प अर्पण करावे. फूल वाहताना जणू आपला संकल्पच अर्पण करत आहोत अशी भावना ठेवावी.

## सामूहिक संकल्प

**अध्वर्यू व उपासक :**

उद्याच्या भारताने
भौतिक प्रगती साधून
एक संपन्न व अग्रगण्य राष्ट्र बनावे,
यासाठी आम्ही विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा
विकास करू. **ॐ समर्पयामः ।।**

समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत
अन्न, वस्त्र, निवारा,
आरोग्य, शिक्षण, रोजगार,
पाणी आणि वीज पोचावी
वैभवाची फळे पोचावीत
यासाठी आम्ही प्रयत्न करू. **ॐ समर्पयामः ।।**

विविध जातींचे, संप्रदायांचे
आणि भाषांचे सामाजिक गट
प्रेमाने एकत्र येतील
यासाठी प्रयत्न करू. **ॐ समर्पयामः ।।**

वैयक्तिक आग्रहामुळे
कुटुंब, गट किंवा संस्था
मोडली जाणार नाही
याचे भान ठेवू. **ॐ समर्पयामः ।।**

भौतिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात
भारताने जगाचे नेतृत्व करावे
हे आपणा सर्वांचे स्वप्न
साकार करण्यासाठी
आम्ही वैयक्तिक व सामूहिकरित्या
मन:पूर्वक साधना करू. **ॐ समर्पयामः ।।**

**अध्वर्यू :** या सामूहिक संकल्पांच्याबरोबरीने व्यक्तिगतरित्यासुद्धा मातृभूमीची पूजा प्रत्येकाकडून व्हावी यासाठी पाच प्रकारचे व्यक्तिगत कृति-संकल्प पुढे दिले आहेत. ते माझ्या पाठोपाठ म्हणावेत.

**अध्वर्यू व पाठोपाठ उपासक :**

माझ्या रोजच्या दिनक्रमात
मी काही मिनिटे
घरच्या स्वच्छतेबरोबर
परिसराच्या स्वच्छतेसाठी
लक्ष घालीन. / **ॐ समर्पयामः ।।**

मी प्रत्येक आठवड्यात
काही वेळ
माझ्या कुटुंबापलीकडील व्यक्तींना
आवश्यक ती मदत करण्यासाठी वापरेन. / **ॐ समर्पयामः ।।**

मला समजलेले चांगले विचार
आणि मला पटलेली चांगली कामे
मी इतरांना समजावून
आणि पटवून द्यायचा
प्रयत्न करीन. / **ॐ समर्पयामः ।।**

मी दर महिन्यातून एकदा
समाजातील विकासाची कामे
जाणून घेण्यासाठी

आणि त्यात सहभागी होण्यासाठी
काही वेळ देईन. / **ॐ समर्पयामः ।।**

माझ्या वार्षिक उत्पन्नाचा
ठराविक हिस्सा
मी गरजू व्यक्ती, कुटुंबे
किंवा संस्थांसाठी देत जाईन. / **ॐ समर्पयामः ।।**

हे परमेश्वरा
आमच्या या सामूहिक संकल्पांना
आणि वैयक्तिक संकल्पांना
तुझे आशीर्वाद असू देत.

**अध्वर्यू :** आता दोन मिनिटे डोळे मिटून आपण केलेले संकल्प मनातल्या मनात आठवूया. स्वत: त्याप्रमाणे वागण्याचा निश्चय करूया व इतरांना असे वागायला सांगण्याचे बळ आपल्याला मिळो अशी प्रार्थना करूया. या चिंतनानंतर पुन्हा तीन वेळा माझ्या पाठोपाठ ओंकार म्हणावा. नंतर नमस्ते एक म्हटल्यावर सर्वांनी हात जोडावेत. दोन म्हटल्यावर मान खाली वळवावी. तीन म्हटल्यावर समोर बघून हात खाली सोडावेत. त्यानंतर उपासना संपेल. त्यानंतर शक्य असेल त्यांनी पुढे येऊन मातृभूमीच्या प्रतिमेला फूल वाहावे. सर्वांनी प्रसाद घेऊन मगच जावे.

**---- दोन मिनिटे मौन चिंतन ----**

**अध्वर्यू व पाठोपाठ उपासक : ॐ। ॐ। ॐ।**

**अध्वर्यू : नमस्ते १ - २ - ३**

# विद्यारंभ उपासना – गद्यसंकल्प

**प्राथमिक शिक्षण संपवून माध्यमिक शाळेत शिक्षणाला सुरुवात करताना आपण यापुढील शिक्षण का घ्यायचे आहे हे समजून घेण्यासाठी विद्यारंभ उपासनेची योजना केली आहे. त्यावेळी विद्यार्थी पुढील संकल्प करतात.**

विद्या शिकण्याच्या तयारीची
पहिली पायरी म्हणून
आम्ही खूप खेळ खेळू,
उत्तम व्यायाम करू.
शरीर सुदृढ करू, काटक करू.
उत्तम लेखन करायला शिकू.
भरपूर वाचन करू.
खूप पाठांतर करू.
अनेक कौशल्ये शिकू
व विविध कलांचा अभ्यास करू.
स्वच्छता आणि नम्रतेच्या सवयी
आमच्या अंगी बाणवू.
आमचा सर्व अभ्यास
आमच्या कुटुंबियांना, शेजाऱ्यांना
आणि ज्यांना मदतीची गरज आहे
अशा सर्व लोकांना उपयोगी व्हावा
यासाठी आम्ही प्रयत्न करू.
आम्ही परमेश्वराला प्रार्थना करतो की,
आमचा हा संकल्प पूर्ण करण्यासाठी
लागेल तेवढे बळ आम्हाला मिळो.

# वर्षारंभ उपासना – गद्यसंकल्प

**शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी म्हणजेच वर्षारंभ समारंभामध्ये विद्यार्थी खालीलप्रमाणे संकल्प करतात.**

राष्ट्रार्थ भव्य कृति काही पराक्रमाची।
ईर्ष्या निजांतरी धरूनि करावयाची।।
खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी
अशी तीव्र तळमळ मनात धरून
आम्ही एकत्र जमत आहोत.
हे परमात्मन्,
तू याचा साक्षी हो!
जेथे आम्ही पदार्पण करू
तेथे मौलिक नि मूलगामी कार्य
आमच्या हातून घडेल,
असे होऊ दे.
आमचा देश जागृत व्हावा;
कर्तृत्वाने, पौरुषाने चमकावा;
विद्या आणि शास्त्रे यांत पारंगत व्हावा;
हे चैतन्यसागरा!
तुझे स्फुरण आमच्या देशात भरून राहिलेले असावे,
हीच अंतरीची तळमळ आहे.
परमात्मन्,
आपणांस स्मरून
आम्ही संकल्प करतो.
उपासना, स्वाध्याय-प्रवचन आणि सद्‌गुरुसेवा
यांचा आम्ही सदैव अवलंब करू.
शरीर सुंदर, सतेज करू.
विवेके, विचारे, देशकारणे
व्यक्तिमत्त्व पुनीत करू.
परमेश्वरी शक्तीचे अवतरण
सर्व मानव समाजात होण्यासाठी
आम्ही आमच्या विद्येचा उपयोग करू.

# वर्षान्त उपासना – गद्य संकल्प

**शैक्षणिक वर्षाच्या शेवटी म्हणजेच वर्षान्त समारंभामध्ये विद्यार्थी खालीलप्रमाणे संकल्प करतात.**

राष्ट्रार्थ भव्य कृति काही पराक्रमाची।
ईर्ष्या निजांतरी धरूनि करावयाची।।
खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी
अशी तीव्र तळमळ मनात धरून
आम्ही एकत्र जमत आहोत.
हे परमात्मन्,
तू याचा साक्षी हो!
जेथे आम्ही पदार्पण करू,
तेथे मौलिक नि मूलगामी कार्य
आमच्या हातून घडेल,
असे होऊ दे.
कार्ये केवळ सदिच्छेने सिद्धीस जात नाहीत,
त्यासाठी संघटना करावी लागते.
वेदांनी हेच सांगितले.
**'समानी व आकूतिः,**
**समाना हृदयानि वः।'** (ऋ. १०.१९१.४)
आपणा सर्वांचा आशय एक असो,
आपणा सर्वांची हृदये अभिन्न असोत,
श्री शिवछत्रपतींनी तेच सांगितले,
"दोन हृदये एकत्र येतील
तर संकटांच्या पहाडांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडतील."
मग अशा एकत्रित हृदयांची संघटना

आमच्या हातून घडो.
आमची मने
संघटनेला आवश्यक अशी,
लवचिक आणि जुळवून घेणारी,
परस्परांना प्रेमाने बांधणारी,
आणि कोणत्याही कारणासाठी
परस्परांपासून न तुटणारी
अशी होवोत.
जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात
आम्ही संघटना घडवू.
आमचा देश जागृत व्हावा,
कर्तृत्वाने, पौरुषाने चमकावा,
विद्या आणि शास्त्रे यांत पारंगत व्हावा.
परमेश्वरी शक्तीचे अवतरण
सर्व मानव समाजात होण्यासाठी
आम्ही आमच्या विद्येचा उपयोग करू.
हे चैतन्यसागरा !
तुझे स्फुरण आमच्या देशात भरून राहिलेले असावे,
हीच अंतरीची तळमळ आहे.
हे परमेश्वरा ! हे सर्व घडूदे !
तुझे मंगल आशीर्वाद
आम्हास नित्य लाभू देत !
आमचा कण न् कण आणि क्षण न् क्षण
तुझ्याच इच्छेने सार्थकी लागू दे !

# विद्याव्रत संस्कार – गद्यसंकल्प

**प्रतिवर्षी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी**
**विद्याव्रतग्रहण संस्कार अथवा उपनयन संस्कार केला जातो.**
**त्यावेळी विद्यार्थी खालील संकल्प करतात.**

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची !
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची !!
खरोखर राष्ट्रहितार्थ
जीवनात पराक्रमाची उत्तुंग कृती घडावी
यासाठी हा संकल्प !
हे परमात्मन्
तू याचा साक्षी हो.
मनुष्यजातीत जीवन
चार आश्रमांतून वाहत असते.
ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास
हे ते चार आश्रम होत.
आज आम्ही सर्व, पवित्रभावे
ब्रह्मचर्याश्रमाचा स्वीकार करीत आहोत.
हे परमात्मन्
आपणास स्मरून
आम्ही असा संकल्प करतो की
आम्ही युक्ताहारविहार या व्रताचे
परिपूर्ण पालन करू.
ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये संयत ठेवू ,
तुझ्या शोधात त्यांना गुंतवू.
उपासना, स्वाध्यायप्रवचन आणि सद्‌गुरुसेवा
यांचा आम्ही सदैव अवलंब करू.
शरीर सुंदर, सतेज करू.

विवेके, विचारे, राजकारणे
व्यक्तिमत्त्व पुनीत करू.
या व्रतापासून आम्ही कधीही ढळणार नाही.
आयुष्याच्या किमान पंचवीस वर्षांपर्यंत
आम्ही विद्याभ्यास करू.
नंतर इतर आश्रमांत
यथावकाश प्रवेश करू.
भगवान रामचंद्र गुरुगृही राहिले होते,
भगवान श्रीकृष्ण गुरुगृही राहिले होते,
आम्हीसुद्धा गुरूंच्या सान्निध्यात राहू.
आमच्या जीवनामधून तेजाचा आविष्कार करू.
ग्रंथ हे सुद्धा गुरू होत.
सर्व सृष्टी ही सुद्धा गुरू होय.
ह्या गुरूंना प्रसन्न ठेऊन
आम्ही उत्तमोत्तम विद्या संपादन करू.
आमची विद्या
ही सज्जनांना अभय देण्यासाठी
आणि दुष्टांचे दमन करण्यासाठी असेल.
परमेश्वरी शक्तीचे अवतरण
सर्व मानव समाजात होण्यासाठी
आम्ही आमच्या विद्येचा उपयोग करू.
हे परमेश्वरा,
हे सर्व घडू दे.
तुझे मंगल आशीर्वाद
आम्हांस नित्य लाभू देत.
आमचा कणन् कण आणि क्षणन् क्षण
तुझ्याच इच्छेने सार्थकी लागू दे !

# *गणेश प्रतिष्ठापना – गद्यसंकल्प*

**श्रीगणेश प्रतिष्ठापनेच्या दिवशी प्रतिष्ठापना झाल्यानंतर खालीलप्रमाणे संकल्प केला जातो.**

राष्ट्रार्थ भव्य कृति काहि पराक्रमाची !
ईर्ष्या निजांतरि धरूनि करावयाची !!
खरोखर देशाच्या हितासाठी आणि उन्नतीसाठी
आम्हा सर्वांच्या हातून
सामूहिकरीत्या काही मोठे कार्य घडावे
अशी तळमळ मनात धरून
आम्ही एकत्र जमत आहोत.
हे विघ्नहर्त्या श्रीगणेशा,
आमच्या संकल्पाला
तुझे शुभाशीर्वाद असू देत.
हे गणराया,
तू संघटनेची देवता आहेस.
तुला स्मरून
आम्ही असा संकल्प करतो की
आम्ही सर्व एकदिलाने राहू.
हाती घेतलेले कार्य सिद्धीस नेण्याचा
सर्व शक्तीनिशी प्रयत्न करू.
व्यक्तीपेक्षा कार्य मोठे असते,
हा मंत्र आम्ही सदैव लक्षात ठेवू.
आणि त्यानुसार कार्याच्या हितासाठी
वैयक्तिक स्वार्थाला तिलांजली देऊ.
हे बुद्धिदायका,
तू सर्व विद्या आणि कलांचा अधिष्ठाता आहेस.
आमच्या देशात जीवनाच्या सर्व क्षेत्रांत,

सदैव नवीन संशोधन व्हावे,
ते ज्ञान समाजाच्या कारणी लागावे
आणि त्यातून सर्व समाजाचे जीवन
संपन्न आणि समृद्ध बनावे,
असा प्रयत्न करण्याची बुद्धी
तू आम्हा सर्वांना दे.
हे परमेशा !
तुझ्या पावित्र्याची विटंबना
आमच्या हातून कधीही न घडो
विद्येचे व्यसन आणि सत्कार्याचे व्यसन
ही दोनच व्यसने आमच्या मनात असोत.
अन्य सर्व व्यसनांपासून
आम्हाला मुक्त कर,
आणि अशाप्रकारे,
हा समज सद्‌गुण संपन्नतेकडे
वाटचाल करो !

# बलिप्रतिपदा–वहीपूजन – गद्यसंकल्प

**बलिप्रतिपदेच्या दिवशी वहीपूजन करताना सर्वजण असा संकल्प करतात.**

आत्म्याच्या धारणेसाठी
ज्याप्रमाणे देहाची आवश्यकता असते,
त्याप्रमाणे कोणत्याही सत्कार्यासाठी
धनसंपदेचे, ऐहिकाचे अधिष्ठान असावे लागते.
म्हणून आम्ही देवी सरस्वतीप्रमाणेच
हे लक्ष्मीदेवी, हे धनदेवते,
तुझे स्तवन–पूजन करीत आहोत.
हे देवते,
आम्ही तुझी मनापासून प्रार्थना करतो की,

ज्ञान प्रबोधिनीच्या या परमेश्वरी कार्यावर
तू प्रसन्न हो
प्रबोधिनीचा अर्थव्यवहार
प्रतिवर्षी वृद्धिंगत होत जावो.
सार्वजनिक धनाचे रक्षण करणे,
त्यातून अधिक भौतिक समृद्धी निर्माण करणे,
व तिला सद्‌गुणांची जोड देणे,
असे महत्त्वाचे कार्य
आम्ही अंगीकारले आहे.
आर्थिक व्यवहारातील पावित्र्याचे
आम्ही मन:पूर्वक पालन करू.
धनाचा विनियोग
योग्य त्याच कारणासाठी
व योग्य त्याच प्रमाणात होतो आहे,
याची आम्ही काळजी घेऊ.
धनाच्या वृद्धीबरोबर
आमच्या मनोवृत्तीत अहंकार येणार नाही,
यासाठी आम्ही जागरूक राहू.
संपत्ती ही मनुष्याच्या विकासासाठी आहे,
मनुष्याने संपत्तीचा दास व्हावयाचे नाही,
अशी आमची दृढ धारणा आहे.
म्हणूनच, प्रबोधिनीच्या अर्थव्यवहाराचे
सर्वार्थाने विश्वस्त म्हणून
शुद्ध आचरण करण्याचा संकल्प
आम्ही करीत आहोत.
हा संकल्प सिद्धीस नेण्यासाठी
हे परमेश्वरा,
तुझे आशीर्वाद आम्हांला लाभू देत.

समाज विकसनाचे आणि परिवर्तनाचे कार्य करत असताना
कार्यकर्त्यांना स्वत:च्या व्यक्तिविकासाची प्रेरणा मिळणे,
या राष्ट्राच्या उज्जवल परंपरेचे स्मरण राहणे,
आज देशासमोर असलेल्या आह्वानांना सामोरे जाण्यासाठी
कार्यरत राहण्याची ऊर्मी टिकणे, ध्येयाचे सतत दर्शन होणे अन्
समूहभावनेचा विकास होणे या साऱ्या उद्दिष्टांच्या दृष्टीने
या 'प्रबोधन गीतां'चे महत्त्व आहे.

या सर्व गीतांना अत्यंत अर्थपूर्ण अशा चालीही लावण्यात आल्या आहेत.
ज्ञान प्रबोधिनीमध्ये विविध बैठकी व सभांच्या प्रारंभी, सहलींमध्ये,
शिबिरांमध्ये आणि इतरही विविध प्रसंगी
उत्स्फूर्तपणे ही गीते गायली जातात.

कोणत्याही राष्ट्रातील युवक-युवतींच्या ओठांवर असणारी गीतं
म्हणजे जणू काही त्या राष्ट्राच्या भविष्याची नांदी असते.
महाराष्ट्रातील अनेक युवक-युवती, अध्यापक,
पालक, संघटक, शिक्षणप्रेमी या सर्वांना
ही 'प्रबोधन गीते' स्फूर्तिदायी ठरतील असा विश्वास वाटतो.


**'प्रबोधन गीते' भाग १ प्रमाणेच भाग २ ही प्रसिद्ध !**
**भाग २ मध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यकर्त्यांव्यतिरिक्त अन्य कवी/कार्यकर्त्यांनी रचलेल्या व प्रबोधिनीत गायल्या जाणाऱ्या ८१ गीतांचे संकलन केले आहे.** मूल्य ₹ ३०

***

**प्रबोधन गीते भाग १ मधील ४० गीतांची**
**ऑडिओ सीडी उपलब्ध** – मूल्य ₹ ५०

संपर्क : छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
दूरभाष – ०२०-२४२०७१७५/१०८